Conference Book No 2

ISSN No-2278-5655

NAAC Re- accredited with Grade B

Government of Maharashtra

# Shree Maharani Tarabai Government College of Education, Kolhapur, (Maharashtra)- 416001

One Day Interdisciplinary International Conference

On

# SKILL DEVELOPMENT IN HIGHER EDUCATION



2nd February, 2019

Tel No. 0231-2535043 WWW.smtckop.edu.in Email: princ.smtbedko-mhgov.in

| Sr. No. | Title Name | Author Name | Page No |
|---|---|---|---|
| 44 | Role of IQAC in Maintaining Quality Standards in Higher Education | Sunayana Jotiram Jadhav | 174 |
| 45 | Role of Mass Media in Developing Soft Skills and Body Language among Degree Students of Rural Area: A Survey Study in ELT | TukaramR.Hapgunde & Dr.D.N.More | 178 |
| 46 | उच्च शिक्षणातील समस्या: एक आकलन | प्रा.डॉ.उन्मेश शेकडे | 182 |
| 47 | Theimportance Of Soft Skills In Higher Education | Vijaymala V. Chougule | 185 |
| 48 | Co-relation between Skill Development and Inclusive Education' | Kamalakar Baburao Gaikwad & Dr. Sandip Prabhakar Khedkar | 189 |
| 49 | Role Of ICT In Legal Education | Dr Chandrani Shashikant Bagadi | 193 |
| 50 | The Role & Impact Of ICT In Improving The Quality Of Education | Prashant G.Kumdale | 196 |
| 51 | Skill Development As A Challenge In Higher Education In 21st Century | Dr. JadhavBhikaLala | 198 |
| 52 | Skill Development in 21st Century | Jagdish Ganpati Kumbhar | 202 |
| 53 | ICT For Teacher Education Programme | Dr. Sharad B. Ingawale | 205 |
| 54 | Challenges And Opportunities For Skill Development In Higher Education | Dr Manjunath Bhat | 208 |
| 55 | Role of Skill Development in Higher Education | Dr. M.S. Patil & Dr. H. Y. Kamble | 210 |
| 56 | Leadership Skills for Librarians | Mrs.SandhyaGirishYadav | 214 |
| 57 | Skill Development in 21st Century | Dr.Nafisa Roopawalla | 218 |
| 58 | Women's Empowerment Through Skill Development | Dr. Smt. Desai M.B. | 222 |
| 59 | कौशल्य विकास शिक्षणाची गरज | प्रा. डॉ. रेखा रामनाथ बने | 226 |
| 60 | Development and Assessment of Teaching Skills in Teacher Education: A Case Study | Ganesh Chandra Naik & Jojen Mathew | 228 |
| 61 | A Study On The Role Of Higher Education In National Integration | Smt. Raziyabegum F Sheikh Jayaramaiah | 232 |
| 62 | Communication Skills Development in TEP. | Dr. Sarjerao Pandurang Chavan | 236 |
| 63 | Development of Life Skill in Higher Education- A Life Beyond the Classroom | Sangeeta Rajaram Kadam | 239 |
| 64 | Essential Soft Skills To Be Instilled In B. Ed Trainees (Apart From Teaching Skills) | Dr. Sushma A. Narasgouda | 243 |

# कौशल्य विकास शिक्षणाची गरज

प्रा. डॉ. रेखा रामनाथ बने
राज्यशास्त्र विभाग, कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड

व्यक्तिच्या सर्वांगीण विकासाचे सर्वात महत्वाचे साधन हे शिक्षण आहे. शिक्षणामुळेच व्यक्तिचा शारीरीक, बौध्दीक आणि आत्मीक विकास होतो. व्यक्तिला नोकरी व रोजगार उपलब्ध करून देण्याचे ते एक माध्यम आहे. भावी पिढयांच्या सशक्त समृध्द जिवनाचा तो महामंत्र व राष्ट्रविकासाचा आत्मा आहे. मात्र त्यासाठी राष्ट्रउभारणीस कारक ठरणाऱ्या जबाबदार नागरीकांची निर्मीती ज्या शिक्षणव्यवस्थेत साध्य ठरेल अशा व्यवस्थेची उभारणी त्या देशाने करणे आवश्यक आहे. ज्या देशामध्ये ज्ञान आणि कौशल्याला उच्चतम महत्व दिले जाते. तोच देश सांस्कृतिक व सामाजीक प्रगती करत असतो.

कोणत्याही देशाच्या आर्थिक प्रगती व सामाजीक विकासाचे कौशल्य आणि ज्ञान हे प्रशिक्षण शक्ती आहेत. उच्च आणि चांगल्या स्तरावरील कौशल्य असलेले देशकामाच्या आव्हानांना आणि जगाच्या संधीना अधिक प्रभावीपणे समायोजीत करतात. कोणत्याही देशामध्ये कौशल्य विकास कार्यासाठी मुख्यत: युवा पिढीवर लक्ष केंद्रीत केले जाते. या संदर्भात भारताची स्थिती चांगली आहे. भारताकडे एकूण लोकसंख्येच्या ६०५ दशलक्ष लोक २५ वर्षापेक्षा लहान आहेत. रोजगारासाठी उपयुक्त कौशल्य प्राप्त करून युवा पिढी परीवर्तनाचे प्रतिनिधीत्व करू शकतात. त्यासाठी युवा पिढी निरोगी, सुशिक्षीत व कुशल होईल तेव्हाच त्यांचा लाभ आपल्या अर्थव्यवस्थेला होवू शकतो.

आजच्या शिक्षणव्यवस्थेबद्दल विद्यार्थी आणि पालक वर्ग संभ्रमावस्थेत जात आहे. कारण सध्याच्या शिक्षणवयवस्थेत प्रशिक्षीत तरूणांना नोकरी करता येण्याजोगे कौशल्य मिळत नाही. उच्च शिक्षण घेतल्यानंतर नोकरीची हमी मिळेल काअसा प्रश्न विद्यार्थी आणि पालकांना पडत आहे. असा प्रश्न पडण्याचे कारण सामाजीक वास्तवेत दडले आहे. शिक्षण आणि नोकरी असे समीकरण आपल्याकडे तयार झाले आहे. शिक्षण हे अर्थाजनासाठीच करायचे असते अशी समजूत होत चालली आहे आणि ते गैर ही नाही. खऱ्या अर्थाने शिक्षणाचा संबध हा रोजगारासाठी आहे. मात्र आपल्याकडील शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानावर भर देणारे असल्यामूळे शिक्षण आणि कौशल्य यांची फारकत शालेय स्तरापासून होते. त्यामूळे शिक्षण घेतल्यानंतर व्यक्तिच्या जीवनउभारणीची निश्चित दिशा मिळत नाही. अलीकडे याची जाणीव सर्वांना होत असल्यामूळे कौशल्याधारीत शिक्षण व्यवस्थेकडे कल निर्माण होत आहे. कोठारी आयोगापासून राष्ट्रीय ज्ञान आयोगापर्यंत अनेक आयोंगानी व्यावसायीक शिक्षणांची गरज नमूद केली आहे. त्याआधारे कौशल्य आधारीत शिक्षणावर भर देण्यात आला आहे. राष्ट्रपती प्रणव मुखर्जीनी संसदेतील भाषणात **हर हाथ को हुनर**असे म्हणत नॅशनल मल्टी स्किल मिशन राबवणार असल्याचे सांगीतले.इयत्ता ६ वी वर्गापासून कौशल्य विकास अभ्यासक्रमाची ओळख करून द्यावी. त्याचप्रमाणे बारावी उत्तीर्ण होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना कामाचा अनुभव मिळावा यासाठी **खरी कमाई**सारखी योजना सुरू करण्यात यावी अशी शिफारस राज्याच्या शिक्षण विभागाने शैक्षणीक आराखडयाच्या अहवालात केली आहे. प्रत्येक माध्यमिक शाळेत **करीयर लॅब** तयार करण्याची संकल्पनाही या आराखडयात मांडण्यात आली आहे.

कौशल्य शिक्षणावर भर देवून कुशल मनूष्यबळ विकसीत करण्याची चर्चा मनमोहनसिंग सरकारच्या काळापासून ते सध्या सत्तेत असलेल्या मोदी सरकारच्या काळातही सुरू आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले पद स्विकारल्यानंतर मंत्रीमंडळ तयार केले आणि त्यात कौशल्य विकास आणि उद्योजकता हे नविन खाते तयार केले. भारतात स्वांतत्र्यांनंतर प्रथमच असे खाते तयार करण्यात आले. पंतप्रधान मोदीना त्याचे महत्व पटले होते. यापूर्वी माजी राष्ट्रपती डॉ. अब्दूल कलाम यांनी १९९१ साली **व्हिजन २०२०** हा ग्रंथ लिहिला होता. त्यामध्ये ही कौशल्य विकासाच्या कल्पनेचा खुप जवळचा संबध होता. आज प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (पीएमकेव्हीवाय) ही युवकांच्या कौशल्य प्रशिक्षणासाठी एक मुख योजना आहे. या योजनेअंतर्गत अभ्यासक्रमात सुधारणा, योग्य शिक्षण आणि प्रशिक्षण शिक्षकावर अधिक लक्ष केंदीत करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शिक्षण आराखडयासाठी राज्याकडून तयार करण्यात आलेल्या अहवालात कौशल्य विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. राज्याचा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभाग उच्च व तंत्र शिक्षण विभागाऐवजी आता कौशल्य विकास विभागाच्या नियंत्रणाखाली आणण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी घेतला. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील सर्व मंजूर पदे अधिकारी, कर्मचारी, अर्थसंकल्पीय तरतूद व तसेच आस्थापना विभागातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाची सर्व कार्यासने, पदे, अधिकरी, कर्मचारी आदी तरतूदी आता नवनिर्मीत कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखाली येणार आहेत.

पुर्वी कला शाखेत कौशल्याधारीत शिक्षणाचा फारसा समावेश नव्हता. मात्र अलिकडे पदवी आणि पदव्यूत्तर शिक्षणातही कौशल्य विकासावर आधारीत अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात येत आहे. पुणे विद्यापीठानंतर स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड नेही कौशल्याधारीत शिक्षणावर आधारीत अभ्यासक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. त्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षक वर्गाकडूनही चांगली साथ मिळाली पाहीजे. कारण आतापर्यंत आम्ही पारंपारीक पदवी अभ्यासक्रम किंवा थेट इंजिनीयरींग, मेडीकल यामध्येच बहुतांश रस आणि विश्वास सर्वांचा राहीलेला आहे. तेव्हा कलाशाखेतील या कौशल्याधारीत शिक्षणाला चांगला प्रतिसाद मिळाला तर निश्चितच रोजगार उपलब्धी व करीयर निश्चिती मिळण्यास त्याची मदत होवू शकते.

**संदर्भ :–**

१. भारत २०१७

२. लोकराज्य फेब्रूवारी २०१८

३. Loksatta.com, 12/01/2019

4. Maharashtratimes.com

Conference Book ISSN No-2278-5655

NAAC Re- accredited with Grade B

Government of Maharashtra

# Shree Maharani Tarabai Government College of Education, Kolhapur, (Maharashtra)- 416001

One Day Interdisciplinary International Conference

On

# SKILL DEVELOPMENT IN HIGHER EDUCATION



2nd February, 2019

Tel No. 0231-2535043 www.smtckop.com Email: princ.smtbedko-mhgov.in

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

| | | | |
|---|---|---|---|
| 18 | पदवी व पदवीत्तर स्तरावर कादंबरी अध्यापनाचे स्वरूप व कौशल्य | डॉ.अशोक कैंद्रे | 75 |
| 19 | भारतीय स्त्री शिक्षणातील बदलते प्रवाह | डॉ.जी.एन.पांचाळ व डॉ.एन.जी.सूर्यवंशी | 77 |
| 20 | द्विवार्षिक बी.एड कालावधीतील छात्राध्यापकांच्या स्वकौशल्य संपादनाचा अभ्यास | डॉ.प्रतिभा देसाई | 82 |
| 21 | मराठी भाषिक कौशल्ये आणि व्यवसायाच्या संधी | डॉ.मोरे अर्चना | 87 |
| 22 | शासनाकडून प्राथमिक स्तरावरील शिक्षणासंबंधी घेतलेल्या निर्णयांचा शिक्षकांच्या कामगिरीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास | डॉ.रावसाहेब शेळके | 90 |
| 23 | कौशल्याधारित शिक्षणाचे महत्व | डॉ.नदाफ एस.आय व डॉ.पांढरे वासंती | 93 |
| 24 | एकवीसाव्या शतकातील माहिती तंत्रज्ञान कौशल्याचे विकसन - एक अभ्यास | डॉ.प्रीती पाटील | 95 |
| 25 | कर्णबधीर विध्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणातील कौशल्य विकासामधील आव्हाने व संधी | स्वाती सदकाळे | 99 |
| 26 | Transformation Of Society Through Social Media | Dr.Madhuri Isave | 100 |
| 27 | Higher Education Of Skill Development In Urban And Rural Region | Dr. Bhaskar A. Mundewadi | 103 |
| 28 | प्रताप तत्वज्ञान केंद्राच्या तात्वीक विचारांचा अभ्यास | डॉ.नितीनकुमार दादासाहेब माळी प्रा.नरेश पितांबर सावंत | 107 |
| 29 | Role of ICT and Constructivist Design for Teaching Skill Development | Dr. Kisan Jijaba Shinde | 110 |
| 30 | Innovative Practices To Enhance Teacher Education | Dr.Suryawanshi S.K | 114 |
| 31 | Role of Skill Development in Higher Education for Promoting Employment and Employability in Emerging Global Economy | Prof. Rohini G. Deshpande | 119 |
| 32 | To study the mistakes of 6th Std. Students to construct the sentences and solutions | Patil Prajkta Jagannath | 125 |
| 33 | शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील व्यावसायिक क्षमतांमध्ये वाढ या विषयाअंतर्गत स्व – आकलन संबंधी कौशल्यांच्या विकासासाठी दिलेल्या उपक्रमांच्या परिणामांचा अभ्यास | प्रा. डॉ. सौ. उर्मिला राजेश पाटील | 130 |
| 34 | शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींच्या मराठी आशय ज्ञानासाठी ऑनलाईन मूल्यमापन कार्यक्रम विकसित करणे | डॉ. केशव रामभाऊ मोरे | 135 |


Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Parbhani

# पदवी व वदव्युत्तर स्तरावरकादंबरी अध्यापनाचे स्वरुप व कौशल्य

प्रा. डॉ.अशोक भानुदासराव केंद्रे
मराठी विभाग प्रमुख कै.सौ.शेषाबाईसी.मुंढेकला महाविद्यालय गंगाखडे जि.परभणी

आज महाविद्यायमध्ये कादंबरीचे अध्यापन पदवी स्तरापासूनते वदव्युत्तर स्तरापर्यंत कोठेही करावे लागते. विद्यापीठाच्याअभ्यासक्रमाची उद्दिष्टे सहसा स्पष्टपणेनमुदकेलेलीनसतात. साहजिकच ती गृहित धरुनच अध्यापन - अध्ययन प्रक्रिया सुरुअसते. अशा परिस्थितीत अशी काही उद्दिष्टेनिश्चित स्वरुपात डोळयासमोर ठेवल्याशिवाय कादंबरीच्या अध्यापनासबंधीकेलेलेकोणतेही विवेचन फारसे फलदायी ठरण्याची शक्यता नाही. म्हणून वेगवेगळया स्तरावर उद्दिष्टेकायअसावीत व ती साध्यकरण्याच्या दृष्टीनेकादंबरीची अध्यापन प्रक्रियाकेलीगेली पाहिजे.

विद्यापीठीय स्तरावरील मराठीच्या अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टासबंधीविचारकरतानातोविचार सर्वठायी व सर्वदूर स्थानिकपातळीपर्यंत सुसंगत असायला हवा. विद्यापीठीय स्तरावरील अभ्यासक्रमाविषयीच्या या सूत्रानुसार मराठीचा अभ्यासक्रम प्रथमकल्पावा लागेल. ही प्रक्रियाविद्यार्थ्यांच्या संदर्भातघडणार असल्याने अध्यापन - अध्ययन प्रक्रियेतविद्यार्थी हा घटककेंद्रस्थानीअसला पाहिजे.महाविद्यालवील स्तरावरील विद्यार्थ्याविषयी काही एककल्पना गृहित धरल्याशिवाय पुढेजाता येणार नाही.महाविद्यालयामध्ये शिक्षणघेणाराविद्यार्थी हा लिहीता-वाचता येणारा, विचारकरण्याची व भाषेद्वारे व्यक्तकरण्याचीकिमानक्षमताअसणारा व एकुणच अभ्यासविषयाला सामोराजाणारा असा घटक आहे.प्रत्यक्ष व्यवहारात ही कल्पना सर्वस्वी खरीन ठरण्याचीशक्यता आहे. काही विद्यार्थ्यांच्याठिकाणीविद्यार्थी म्हणून काही उणिवा असण्याची शक्यता आहे. अशा उणिवादूरकरण्यासाठीकाही प्रयत्नकरावे लागतील.

कादंबरी या वाङ्मयप्रकाराच्या अध्यापनामागील पहिल्या स्तरावरील हा हेतू पाहिला तर असे लक्षात येईल की, यास्तरावरकादंबरीशिकविणे आवघड आहे. कविता, नाटक या सारख्यावाङ्मयप्रकारातीलभाषेचा वापर आपल्या दैनंदिनीभाषेच्यावापराहून वेगळा आहे. हे विद्यार्थ्यांना बहुतेकवेळा चटकनजाणवणारे असते. परिणामी अध्यापनासाठी अवश्यकती परिस्थितीतेथेस्वभाविकपणेचनिर्माण होण्यासारखी असते. या उलटकादंबरीतील घटना - प्रसंगाचेजीवनातील घटना - प्रसंगाशी जुळणारे नाते,कादंबरीत भाषेचा होणार निवेदनात्मक वापर यामुळे कादंबरीशिकायची म्हणजे कायकरायचे, हाच विद्यार्थ्याला पडणारा प्रश्नअसतो. विद्यार्थी साक्षर असल्यानेकादंबरी वाचुनकादंबरीतील विषय, त्या विषयासबंधी कादंबरीतजेनिवेदनकेले असेलतते सर्वविद्यार्थ्याला सहज समजु शकते.साहजिकच अध्यापकानेशिकवावे असेकाय आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. विद्यार्थ्यांची अशी अवस्था ही अध्यापनअध्ययनातील मोठीच अडचण असते. त्यामुळे कादंबरीच्या अध्यापनात अध्यापकाला सुरुवातीपासूनचअडचणींशी सामनाकरावा लागतो.या अडचणीतून बाहेर पडण्यासाठीएक सोपा मार्ग आहे.

अध्यापनाच्या सुरुवातीलाच कादंबरीविषयीच्या तात्त्विकविवेचनाकडे, इतिहासाकडे वळणे किंवाकादंबरीतील विषयासबंधी एखादेगंभीर व अवघड विधानकरुनत्या अनुषंगाने अध्यापनालासुरुवातकरणे हा तो मार्ग होय. अशा पध्दतीत आपल्या मताच्या समर्थनासाठीकादंबरीतील सर्व घटकांचा वापरकरता येतो. उदा.आपल्याला 'जिनगानी' ही कादंबरीशिकवायची असेलतर मराठीकादंबरीचाइतिहास, मराठीग्रामीणकादंबरीचे स्वरुप अशाविवेचनाने सुरुवातकरता येईल. 'जिनगानी' ही स्त्रीदुःखाच्या ऐतिहासिक परंपरेचे महत्त्व आजही पटवूनदेणारीकादंबरी आहे.'जिनगानी' मधु सावंतांचीकादंबरी ही स्त्रीच्या जळजळत्या जखमांच्या वेदना अतिशय संवेदनशीलपणे मुखरितकरणारीकादंबरीआहे. कादंबरीचे मुखपृष्ठ, शीर्षक, अर्पणपत्रिका, यातूनही व्यक्त होणारा आहे. कादंबरीतील अनेक गोष्टी व्यंजक आहेत इत्यादींचेसुरुवातीलाच स्पष्टीकरणकरुनत्यामार्गानेविद्यार्थ्यालाकादंबरी वाचायला लावता येईल. अशा अध्यापनामुळे - 'जिनगानी हीकादंबरी म्हणजे नुसती शोकांतीकाच नव्हे.या विधानाचीचिकित्साकरा.''या सारख्या प्रश्नाचे उत्तरविद्यार्थ्याला उत्तमप्रकारे लिहितायेईल यात शंका नाही. परंतु कादंबरीविषयी वेगळी समजूत झाली, तरत्याविद्यार्थ्यालाकादंबरी वाचता येणार नाही. ही समजूतदूरकरण्यासाठी परत'जिनगानी' या कादंबरीचेच उदाहरण घेऊ. येथे हि कादंबरी म्हणजे काय आहे? अशाप्रश्नापासून सुरुवातकरता येईल. या कादंबरीत स्त्रीजन्माचे आदिमदुःख म्हणजे राधा, राणू व गीता, कादंबरीचीनायिका राधाबाईयांच्या जीवनाचे शोकात्मदर्शन अतिशयचित्रवती व जिवंत भाषेत लेखिकेनेकेले आहे. अशा स्वरुपाची अनेक उत्तरे येथेसंभवतात, ही सर्व उत्तरे आपआपल्या परिने योग्यच आहेत. ही अशी उत्तरेएकत्रकरीत असतानाच या कादंबरीतकथानकाशीसबंधनसणा-या अशा अनेक गोष्टींनीकादंबरीची अनेक पृष्ठे व्यापली आहेत. हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणूनदेऊनत्यांना उत्तराबद्दलविचारकरण्यासाठी उद्युक्तकरता येईल. आणि या प्रक्रियेतचकादंबरीतीलइतर भागांचे स्वरुप काय आहे?कादंबरीतील सर्व भागांना लेखिकेनेकसेएकत्रितकेले आहे?

कादंबरीतील घटना - प्रसंग हे परस्परांशी सबंधजोडीत असतात. हेजेवढेखरे, तेवढेचत्यांचीनिर्मिती व्यक्तींच्या अनुषंगाने होत असते हे ही खरे. त्याचबरोबरकादंबरीतील घटना - प्रसंगातूनचकादंबरीतील व्यक्तीरेखांना अवश्यकते व्यक्तीमत्त्व प्राप्त होत असते. वातावरण, घटना - प्रसंग व व्यक्तिचित्रण यांच्या यासबंधाकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधूनकादंबरीकाराने हे सबंधकिती समरसतेनेनिर्माणकेले आहेत. कादंबरीतील व्यक्तिचित्रण ववातावरण म्हणजे काय?या विषयाची विद्यार्थ्यांचीजाणीवजागृत होऊ शकेल.

'जिनगानी' कादंबरीचे उदाहरण घ्यायचेतर या कादंबरीतील राधा, विठू पाटील, श्रीपती, राणू, विजय व गीता यांसारख्याअनेक व्यक्तिरेखा लेखिकेनेकशा उभ्या केल्या आहेत. हे पाहताना त्या व्यक्तिंच्या बोलण्यातून, वर्तनातूनत्यांचेकोणते विशेषजाणवतात असा प्रश्नविचारता येईल. व्यक्तिचित्रणातीलजिवंतपणा व साचेबंधपणा म्हणजे काय, असेचभावनात्मक परिणामांची उत्कटता आणि भावविवशता म्हणजे काय, हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणुनदेता येईल, ते पुढिल प्रमाणे. गीताच्या संसाराचाइस्कोट झाल्यानंतर राधाबाई एका वेगळयाच मानसिक अवस्थेतजातात. त्यांना समग्र स्त्रीजीवनाच्यादुःखाचीएक वेगळीच जाणिवहोते. त्यांना आपली बहीन राणुबाईची, गीताची, मीराची सगळया

स्त्रीजातीच्या 'जिनगानी'ची दशा आठवते आणित्या भोवळयेऊन पडतात.कादंबरीच्या अध्यापन प्रक्रियेतकादंबरीतजीवनाचेचित्रण असते, संदर्भ असतात, परंतुकादंबरी म्हणजे जीवन नव्हे, हासंस्कार महत्त्वाचा आहे. कादंबरीत येणारेजीवन लेखकाने विशिष्ट दृष्टीने पाहिलेले जीवन असते. विद्यापीठस्तरावर पाठ्यपुस्तकम्हणून कादंबरीचे अध्यापन पुढील पदवी - पदव्युत्तर स्तरावरही करावे लागते. या दोन्ही स्तरावरीलविद्यार्थ्यांना ललित साहित्याकडेकसे पाहायचे असतेत्याचीजाणिव आहे, असे गृहित धरल्याशिवाय प्राध्यापकाला पुढेजाता येत नाही. म्हणूनच या स्तरावरअध्यापनकरीत असताना सुरुवातीलाचविद्यार्थ्यांचेकादंबरीविषयीचे आकलनविद्यार्थ्यांकडून व्यक्तकरुनघेता येईल. असेझाल्यानंतरच, अध्यापन व अध्ययन प्रक्रियेतविद्यार्थी व प्राध्यापक यांना सुसंगतता लाभेल.

संदर्भग्रंथ सूची :-


१) साहित्याचे मानदंड : रणांगण - गंगाधर गाडगीळ.

२) प्रतिभासाधन - ना.सी. फडके

३) सर्जनाचा शोध - डॉ.मधु सावंत

४) मराठीचे अध्यापन - आकोलकर पाटणकर

५) वाङ्मयाचे अध्यापन - 'महाविद्यालयीन स्तरावरकादंबरीचे अध्यापन' - प्रा.गंगाधर पाध्ये -(संपा. डॉ.वा.पु.गिंडे-डॉ.द.दि.पुंडे)

६) जिनगानी (कादंबरी ) - मधु सावंत.

UGC Sponsored

SN 2319-9318

International Multilingual Research Journal

Printing Area

Special Issue Area March 2019


# ONE DAY INTERDISCIPLINARY INTERNATIONAL CONFERENCE

on

# MAHATMA @ 150

on

2nd March 2019



Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

Organized by

**Gandhi Study Centre**

New Arts, Commerce & Science College,
Wardha, Maharashtra (India) - 442 001

2

# आधुनिक भारताचा शाश्वत विकास गांधीविचारात.

प्रा.डॉ. अशोक भानुदासराव केंद्रे.
मराठी विभाग प्रमुख,
कै.सौ. शेषाबाई सीताराम मुंढे
महाविद्यालय, गंगाखेड जि.परभणी. 431514
भ्र.ध्व. 9421789934
Email:ashokb.kendre@gmail.com

मोहनदास करमचंद गांधी, 'राष्ट्रपिता' म्हणून महात्मा गांधींचे नाव संपूर्ण भारतालाच नव्हेतर पूर्ण जगाला माहीत आहे. आपल्या महापुरुषांना आपण देवतुल्य मानतो. गांधीजींचा जीवनग्रंथ हा सर्वांना माहित आहे. 02 ऑक्टोबर 1869. 30 जानेवारी 1948 अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधींनी भारताला स्वतंत्र्य मिळवूनदिले. अहिंसात्मक मार्गांनी स्वतंत्र्य मिळविण्यासाठी संपूर्ण जगाला प्रेरित केले. रविंद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम त्यांना 'महात्मा' अर्थ महान आत्मा ही उपाधी दिली. गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते. 02 ऑक्टोबर हा संपूर्ण भारतात गांधी जयंती म्हणून तर जगभरात आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी भारतात सार्वजनिक सुट्टी असते.

असहकार आणि अहिंसेच्या तत्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग प्रथम दक्षिण आफ्रिकेमध्ये, तेथील भारतीयांना त्यांचे नागरीहक्क मिळवून देण्यासाठी केला. 1915 मध्ये भारतात परत आल्यावर त्यांनी त्यांनी चंपारणमधील शेतकऱ्यांना जुलमी कर व जमीनदार यांच्याविरुध्द लढण्यासाठी एकत्र केले. 1921 मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचची सूत्रे सांभाळल्यानंतर गरिबी निर्मूलन ,आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क, सर्वधर्म समभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वराज्यासाठी देशभरात चळवळ चालू केली. ढासाळत जाणऱ्या खिलाफत चळवळीला त्यानी आधर दिला आणि ते मुस्लिमांचे नेते बनले. गांधींनी आयुष्यभर सत्य आणि अहिंसा या तत्वांचा पुरस्कार केला. स्वतःही याच तत्वांनुसार जगले. आणि इतरांनीही तसे करावे असे सुचविले. त्यानी खेड्यांना खऱ्या भरताचे मूळ म्हणून पाहिले. आणि स्वयंपूर्णतेचा पुरस्कार केला. स्वतः कातलेल्या सुताचे धोतर आणि शाल अशी त्यांची साधी राहणी होती. त्यानी शाखाहाराचा पुरस्कार केला आणि अनेकदा आत्मशुद्धीसाठीआणि राजकीय चळवळीसाठी साधन म्हणून दीर्घ उपवास केले. त्यांच्या शेवटच्या वर्षामध्ये भरत पाकीस्तान फाळणीमुळे व्यथित झालेल्या गांधींनी हिंदू मुस्लिम दंगे थांबण्यासाठी प्रयत्न केले.

महात्मा गांधीं यांनी भारतीय स्वतंत्र्य लढ्यात अहिंसेच्या मार्गाने मोठे योगदान दिले. स्वातंत्र्यलढ्यात संपूण्ड भारतभर प्रवास केला आणि भारतीयांची, खेडोपाडी राहणऱ्या लोकांची परिस्थिती प्रत्याक्ष पाहिली. ही परिस्थिती पाहून त्यांचे मन हेलावून गेले. भारताची परिस्थित, येथील दारिद्य, अज्ञान, परकीय वस्तुंमुळे देशी कुटीरउद्योगांचा झालेला ऱ्हास, समाजातील आर्थिक वसामाजिक विषमता, स्त्रियांना कुटुंबात व समाजात असणारे निम्न स्थान आदी परिस्थिती पाहून भारताला स्वातंत्र्याबरोबर अंतर्बाह्य बदलाची गरज आहे. याची त्यांना खात्री पटली होती .

समाजिक क्षेत्रात सर्वधर्मसमभाव, स्पृश्य व भेद नाहीसा करणे, स्त्रियांना समाजात सन्मानाने वागवणे आदी विचारांचा त्यानी पुरस्कार केला. शिक्षण क्षेत्रात गांधीजींचा विचार फार वेगळा होता. बौध्दिक विकासाबरोबरच शारीरिक श्रमास शिक्षण व्यवस्थेत स्थान असावे असे ते म्हणत. कारण केवळ बौध्दिक विकासाला महत्त्व दिल्याने शारीरिक श्रमाविषयी द्वेश निर्मन हातो, असे त्यांचे स्पष्ट मत होते. पाश्चात्य देशाचे प्रतिमान भरताने स्विकारु नये, कारण पाश्चात्य विचारात भौतिक विकासाला मोठे महत्त्व आहे तर भारतीय संस्कृती व परंपरा यांत भौतिक व नैतिक विकासाला मोठे महत्त्व दिलेले आहे.केवळ भौतिक विकास म्हणजे विकास नव्हे. नैतिक व आध्यात्मिक विकास खूप मोठा आहे केवळ भारत या देशात नैतिक व आध्यात्मिक विकासासह आर्थिक विकास साध्य करण्याची ताकद आहे असेते म्हणत. गांधीजींनी आपल्या जीवनात विविध तत्त्वे मांडली व त्यांचे पालन केले. सत्य, अहिंसा, स्वदेशी, विश्वस्त वृत्ती अशा अनेक तत्त्वांचा उल्लेख करता येईल. गांधी विचारांचा स्विकार करुन या समस्यांवर आपल्याला मात करता येईल.

भारतीय समाजात त्यावेळी विषम वातावरण होते. मागील अनेक वर्षे त्यावर साम्राज्यवादाचा पगडा होता. राजा हा ईश्वरासारखा मानला जायचा व राजभक्ती सर्वोपरी समजली जायची. जातिप्रथा, रुढिवादिता, अज्ञान, परंपराप्रियता, अंधविश्वास यांनी सारे सामाजिक जीवन पार काळवंडून टाकले होते. या आधीही हा समाज बदलण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या संतानी व समाजसुधारकांनी केला ,

पण त्याना अपेक्षित यश आले नाही. गांधीजी सत्य, अहिंसा, आत्मसंयम, नम्रता,वचनबध्दता आणि एक सार्वत्रिक करुणाच घेवून, या क्षेत्रात आले व त्यांना हळूहळू यश मिळू लागले. गांधीजींचा सारा कार्यक्रम या एका मुख्य मुद्यावर केंद्रित होता की जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात जे जे काही अन्याय, निरंकुश व अतिवादी असेल त्या सर्वांचा विरोध करायचा. पण विरोध करताना नसती तोडफोड करायची नाही, हिंसा करायची नाही व अत्याचार करायचा नाही. बदल हवा पणतो शक्यतोवर सामंजसपणे, प्रेमाणे हवा.

गांधीजींनी मांडलेला प्रत्येक विचार हा असा सखोल, सर्वस्पर्शी व प्रत्येकाचे कल्याण विचारात घेणारा असाच आहे. आपण साधे खादीचे उदाहरण घेतले तरी खादी म्हणजे गांधीजींच्या दृष्टीने केवळ ते एक वस्त्र नव्हते. खादीला ते भारताच्या एकतेचे व आर्थिक स्वयंपूर्णतेचे प्रतीक मानत. खादीमुळे लोकांमध्ये चरख्याच्या माध्यमातून संवाद वाढेल, एकमेकांची सुख दुःख ते जाणून घेतीलआणि देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी जी एकता आवश्यक असते ती एकता निर्माण होईल असे ते मानत. खादीच्यामाध्यामातून स्त्रिया आपले योगदान देतील आणि खादी म्हणजे प्रखर देशभक्तीचे एक प्रतीक बनले एवढी एका खादीची गुणवैशिष्ट्ये आणि तिची अंगे गांधीजींनी स्पष्ट केली आहेत.

केवळ एका क्षेत्रात गांधीनी आपली मते मांडली असे नाही. वैद्यकीय क्षेत्रातदेखील निसर्गोपचाराचा गांधीजींनी प्रसार केला. राजकीय क्षेत्रात तर गांधीजींच्या विचाराला तोड नाही. अंतिमतः प्रत्येक शासनव्यवस्थेचे मुख्य ध्येय हे मानवाचे, समाजाचे व देशाचे कल्यानण हेच असावे असे ते म्हणत. स्वराज्यात जर प्रमाने, एकतेने व मानवी नातेसंबंध ओळखून व्यवहार केले तर शासन या संस्थेची गरज उरणार नाही कारण लोक स्वयंशिस्तीने कार्य करीत राहतील. म्हणून शासनसंस्था म्हणजे केंद्रिभूत झालेली संघटित स्वरूपातील हिंसा असे गांधीजी म्हणत. मूल्यांवर आधरीत राजनीतीला गांधीजींनी प्रथम प्राधन्य दिले.

गांधीजी धार्मिक होते, परंतु त्यानी धर्मातील चमत्कार व कर्मकांड यांचा विरोध केला. धार्मिक विचार, कृती यांचा बुध्दीची कसोटी लावून विचार केला. वास्तवाला त्यांनी महत्त्व दिले. म्हणून गांधीजींना 'कृतिशिल संत' असे म्हणण्यात येते. अस्पृश्यतेला हिंदू धर्मावरील कलंक ते मानत. अस्पृश्यता दूर करण्यासाठी त्यांनी मोठे प्रयत्न केले. त्यानी सर्वसमभावाचा पुरस्कार केला.

शिक्षणाविषयीदेखील गांधीजींनी विचार मांडले . शारिरीक,मानसिक व आध्यात्मिक या बाबतीतील उच्च तत्त्वांचे अविष्कारण म्हणजे शिक्षण असे ते म्हणत. कृतिशिल शिक्षणावर त्यांनी भर दिला. श्रमाधिष्ठित शिक्षण पध्दती असावी म्हणजे कुठलाही व्यवसाय श्रेष्ठ वा कनिष्ठ असण्याचा प्रश्नच उरत नाही.

गांधीजींचा आर्थिक विचार हा फार वेगळा होता. गांधीजी अर्थशास्त्र आणि नीतिशास्त्र यांत भेद करीत नसत. जे अर्थशास्त्र केवळ धनाची पूजा करायला शिकविते ते राष्ट्राच्या नैतिक कल्याणास हानिकारक असते असे जे म्हणत. भारताने आर्थिक विकासाचे पाश्चात्य निकषावर अवलंबूनये तर आपल्या देशातील भौगोलिक, सामाजिक व आर्थिक स्थिती यांना अनुरूप ठरेल असे निकष तयार करावे असे ते म्हणत. विचार हा फार गांधीजींनी आर्थिकविकासासाठी खेडे हा केंद्रबिंदू मानला. भारताचा आर्थिक विकास ग्रामीण भागाशिवय होउ शकणार नाही. पाश्चात्याप्रमाणे यंत्रसंस्कृतीची भारताला गरज नाही कारण भारतात श्रम विपूल आहेत असे ते म्हणत.

महात्मा गांधींचा जनसंपर्क प्रचंड होता. ते सतत सामान्य लोकात मिसळत असत, त्यांच्याशी बोलत असत. सामन्य माणसांना गांधीजी आपले वाटत. स्वातंत्र्य लढ्यात अनेक मोठ्या विचारवंतांशी गांधीजींचा संबंध आला. अनेक इंग्रज अधिकाऱ्यांबरोबर त्यांची चर्चा झाली. या सर्व व्यक्तींनी गांधीजींना आपआपल्या दृष्टिकोणातून पाहिले. या सर्व व्यक्तिवर गांधीजींच्या विचाराचा मोठा प्रभाव पडला. गांधीजींचे व्यक्तीमत्त्व इतके बहूआयमी हाते की, त्यांच्य संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा एखादा विशिष्ट पैलू लोकांना आकर्षित करीत असे, परंतु त्याचबरोबर आपण अन्य पैलूंकडे दुर्लक्ष केले ही खंत असे. गांधीजींच्या प्रभावामूळे त्यांची जीवनशैली अनेकानी अंगिकारली व प्रत्याक्षात आणली. त्यांच्यापैकी एक महान व्यक्तिमत्त्व म्हणजे विनोबा भावे होय.विद्यार्थी शारीरिक श्रम करण्यास असमर्थ ठरतो असे ते म्हणत. गांधीजींचा शिक्षणविषयक हेतू हा उदात्त होता.

संपूर्ण समतावादी समाजनिर्मितीचे गांधीजींचे स्वप्न होतेज. धर्म, जात, वर्ण, भाषागांधीजींच्या मनात एक संपूर्ण समताधिष्ठित समाजरचना होती. एक असा समाज जो कुठल्याही भेदभावाशिवाय परस्पर सहयोग व मैत्री यांच्या आधारावर जगेल. धर्म, जात, भाषा इत्यादीमुळे त्यात भेद पडणार नाही. जो स्त्रियांना व पुरुषाना समान मानेल कारण अद्वैतवादी परंपरेनुसार स्त्री व

पुरुष यांच्यातएकाच आत्म्याचा निवास असतो. कधी तरी असा समाज अस्तित्वात असावा असे ते मानीत. आज स्थिती विषम असली तरी असा समाज पुन्हा घडविता येईल याची त्याना खात्री होती. आफ्रिकेमध्ये गांधीजीनी सत्याग्रहाच्या निमित्ताने एका नव्या सामुहिक सक्रियेतेला जन्म दिला. अशी सक्रियता विशेषतः अन्यायाविरूध्द निःशस्त्र संघर्ष करण्याची पूर्वी कधीही जगाने अनुभवली नव्हती. गांधीजी त्यामुळे जागतिक इतिहासात एक व्यापक जनाधार असलेला नेता म्हणून प्रस्थापित झाले. गांधीजींचे विचार व कृती जनतेच्या आकांक्षाचेच प्रतिरूप होती. गांधीजी आणि लेनिन त्या युगातले सर्वसामान्य जनतेच्या आकांक्षाचे खरेखुरे प्रतिनिधी होते. दोघांचे मार्ग भिन्न् असले तरी ध्येय एकच होते.

एकंदरीतमहात्मा गांधीनी आपल्या आयुष्यात जितके कमवले, जितकी कीर्ती संपादन केली, जितके प्रेम मिळवले, तितके कोणत्याही ऐतिहासिक महापुरुषाने क्वचितच मिळवले असेल. असेच म्हणावे लागेल.

संदर्भ सूची:–


१. गांधी विचार – प्रा.डॉ. मु. ब. शहा.
२. हिंद स्वराज्य – महात्मा गांधी.
३. गांधी विचार दर्शन – संपा. भाऊ धर्माधिकारी.
४. साठ महामानव–प्रा. सौ. माधवी कवी.
५. गांधी नयी सदी के लिये –
६. मेरे सपनों का भारत – महात्मा गांधी.
७. हरिजन – संपा. व अनुवादक –दा.न. शिखरे.


**3**

## महात्मा गांधीजीचे सत्याग्रहासंबंधीचे विचार


प्रा. भारती दि. रत्नपारखी / चिमूरकर

सहा. प्राध्यापक(मराठी)
डॉ. आंबेडकर महाविद्यालय चंद्रपूर
bhartichimurkar23@gmail.com
९६६५६७१०१७३


प्रस्तावना :–

महात्मा गांधीजीची जीवनातील तत्वे म्हणजे जगाला मिळालेली देणगी आहे. त्यांचे सत्य, अंहिसा, सत्याग्रह विश्वस्त कल्पना रामराज्य म्हणजे विचारांचा अनमोल ठेवा आहे. गांधीनी स्वातंत्र्यासाठी पुढाकार घेतला होता पण स्वातंत्र्य मिळविण्यासाठी हिसांत्मक मार्गाने जाणे त्यांना मान्य नव्हते. त्यांनी स्वातंत्र्याच्या क्रांतीसाठी सत्य,अंहिसा व सत्याग्रह या तीन शस्त्राचा अवलंब केला. सत्य म्हणजे खरे बोलणे आणि सत्याचा नेहमी विजय होतो. सत्याग्रह म्हणजे त्यांनी जगाला दिलेली देणगीच आहे. स्वतः आत्मक्लेश सहन करुन दुसऱ्याचे हृदयपरिवर्तन करण्यावर त्यांचा भर होता. सत्य अहिंसा व सत्याग्रह यामध्ये क्रांती करण्याची केवढी मोठी ताकद आहे हे त्यांनी संपूर्ण जगाला दाखवून दिले.

बिजसंज्ञा :– सत्य, अहिंसा, सत्याग्रह विचार

सत्याग्रह हा प्रत्यक्ष कृतीचा सर्वात प्रभावी मार्ग आहे असे मत म.गांधीचे होते. त्यामुळे सर्व मार्गाचा अवलंब केल्यानंतर शेवटी या मार्गाचा अवलंब केला जावा.

### गांधीजीचे सत्याग्रहासंबंधीचे विचार :–

सत्याग्रह हे जीवनाचे अंतिम साध्य आहे व त्या साध्यापर्यंत जाण्याचा मार्ग म्हणजे सत्याग्रह होय. सत्याच्या प्राप्तीसाठी या मार्गावरुन चालणारी व्यक्ती सत्याग्रही समजली पाहिजे. सत्याग्रह म्हणजे सत्याचा आग्रह हि एक अध्यात्मिक शक्ती आहे. सत्यापर्यत जाण्याकरीता सत्य शक्तीचा पूर्ण उपयोग म्हणजेच सत्याग्रह होय. सत्याग्रह यात नेहमी आत्मक्लेषाची भावना अतंर्भुत आहे. सत्याग्रह हे शक्तीशाली व्यक्तीचे शास्त्र आहे. दुर्बल व्यक्ती सत्याग्रहाचा उपयोग करु शकत नाही. सत्याग्रह देशप्रेमाचे युध्द आहे. आत्मक्लेषाद्वारे विरोधकास

Conference Book

ISSN No-2278-5655

NAAC Re- accredited
with Grade B


Government of Maharashtra

# Shree Maharani Tarabai Government College of Education, Kolhapur, (Maharashtra)- 416001

One Day Interdisciplinary International Conference

On

# SKILL DEVELOPMENT IN HIGHER EDUCATION



2nd February, 2019

Tel No. 0231-2535043 www.smtckop.com Email: prinс.smtbedko-mhgov.in

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Munde Art's College
Gangakhed Dist.Parbhani

| Sr. No. | Title Name | Name of the Perticipiate | Page No |
|---|---|---|---|
| 143 | UGCs Initiatives in Skill Development through Higher Education | Prof M.M.Javali<br>Dr M. M.Barchiwaley | 539 |
| 144 | Importance of Online Evaluation System for Paper Checking | Prof. Dr. Pralhad K. Mudalkar | 544 |
| 145 | A Study on the India's Labour Market Condition, Higher Education and Skill Requirement | Dr.N.M.Makandar | 547 |
| 146 | Constructivist Pedagogy And Evaluation Practices In Higher Education | Dr.T.M.Prashantha Kumar | 552 |
| 147 | मराठी विषयाच्या अध्यापनाचे कौशल्य | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील | 557 |
| 148 | Sociological Concepts and Life Skills | Dr. Ramesh S. Mangalekar | 560 |
| 149 | शिक्षण प्रणालीत तंत्रज्ञानाची उपयोगीता | डॉ. पिनाटे किरण प्रल्हादराव | 564 |
| 150 | "Beti Bachao, Beti Padhao" (Save Girl Child and Educate Girl Child). | Dr. Krishna F. Pawar | 566 |
| 151 | Need Of ICT-Enhanced Soft Skills In Higher Education | Dr. N.A. Rashidi | 570 |
| 152 | समावेशित शाळेतील शिक्षकांसाठी आवश्यक कौशल्य | श्रीमती कापसे एम.डी. | 574 |
| 153 | उच्च शिक्षणाच्या कौशल्य विकसनातील अडचणी व उपाय | सौ.घाटगे एस.जे. | 579 |
| 154 | Importance Of Skill Development In Higher Education: An Emerging Skill Training For Youth In India | Dr. Vikrant S. Palekar | 584 |
| 155 | Adapting ICT In Rural HEI's: An Overview | Dr. Sarangpani Ramchandra Shinde | 588 |
| 156 | कौशल्य विकास : गरज नव्या युगाची | श्री. प्रविण बाजीराव साळुंके, डॉ. चांगदेव अरविंद बंडगर | 592 |
| 157 | उच्च शिक्षणातील समस्या — चिकित्सक अभ्यास | प्रा.बिचकुंदे शशिकांत संग्राम | 596 |
| 158 | अध्ययन आणि अध्यापनात बहुमाध्यम सचाचा वापर | प्रा.नितीन तुकाराम जाधव | 600 |
| 159 | Skill Development In Higher Education Skill Development In 21st Century | Dr.Vandana R. Kenjale | 607 |


Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

# शिक्षण प्रणालीत तंत्रज्ञानाची उपयोगीता

डॉ. पिनाटे किरण प्रल्हादराव, विभागप्रमुख (लोकप्रशासन विभाग)
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड, जि. परभणी

आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे. जागतिकीकरण ही ठळकपणे पुढे येणारी अपरीहार्य वस्तुस्थिती झाली आहे. कुठल्याही देशाची इच्छा काहीही असो त्यांना जागतिकीकरणात सामील व्हावेच लागत आहे. जागतिकीकरणाचे दोन ठळक परीणाम आहेत. त्यामूळे जगातील सर्व देशांना एकमेकांशी सहकार्य करावे लागत आहे. परंतू त्याचसोबत ते जगाचे दोन भागात विभाजन करत आहेत. जागतिकीकरणामूळे जगातील देशामध्ये आणि प्रत्येक देशात सुध्दा आर्थिक दरी रूदांवतेच. मानवाच्या प्रगतीमागे जागतिकीकरण हे महत्वाचे कारण आहेच पण त्यामूळे संपूर्ण मानव समूहात एक दरी सुध्दा निर्माण झालेली आहे. असे असूनही फक्त काहीच लोकांना संगणक व महाजाल उपलब्ध आहेत आणि वापरता येतात. बहुतेक लोकांना अजूनही संगणक व महाजाल उपलब्ध नाहीत किंवा वापरता येत नाहीत हयालाच Digital Divide' असे म्हणतात.

आधूनिक काळात तंत्रज्ञानात झालेली प्रचंड प्रगती हे जागतिकीकरणाचे मुख्य कारण आहे. हया प्रगतीमूळे आपले संपूर्ण सामाजीक जीवन सुध्दा ढवळून निघत आहे. तंत्रज्ञानातील प्रगती Digital Divide' च्या दोन्ही बाजूला प्रचंड बदल घडवत आहे. जुन्या रोजगार संधी नामशेष होत आहेत. परंतू त्याचसोबत आजपर्यंत अस्तित्वात नसलेल्या नविन रोजगार संधी निर्माण होत आहेत. समाज जीवनावर होणारा हा परीणाम कधी कधी भयावह वाटावा एवढा मोठा आहे.

आज तंत्रज्ञान जीवनातील प्रत्येक अंग व्यापत आहे. तरीदेखील तंत्रज्ञानाचा शिक्षण प्रणालीत फार मोठा शिरकाव अगदी आतापर्यंत तरी झालेला नव्हता. मुद्रण तंत्रज्ञानानंतर जवळ जवळ गेल्या ५०० वर्षापासून आपल्या शिक्षण प्रणालीने कुठल्याही महत्वाच्या नविन तंत्रज्ञानाचा वापर फारसा आत्मसात केलेला नाही. परंतू संगणक महाजालाच्या निर्मीतीनंतर मात्र आता शिक्षण प्रणालीत देखील आमुलाग्र बदल होण्यास सुरूवात झालेली आहे.

सध्याचे एकविसावे शतक हे यंत्र व तंत्र यातूनच पुढे जात आहे. सामाजिक संस्थामध्ये नोंदी, दप्तरे व आनुषंगीक काम यांचे प्राबल्य वाढले आहे. शैक्षणिक संस्थाही याला अपवाद नाहीत. सर्व गोष्टीची नोंद कागदोपत्री ठेवावी लागते. नोंदी, तक्ते, फॉर्म्स याची विपूलता होते. कर्मचारी वर्गाची, शिक्षकांची, मुख्याध्यापकाची, प्रशासकांची शक्ती व वेळ खर्च होतो. त्यामुळे शैक्षणिक संस्थामध्ये दिवसेंदिवस कामाचा बोजा, गुंता वाढत आहे. संस्थेच्या कार्यपध्दतीची, व्यवस्थेची उपयुक्तता, यशस्वीता बारीक सारीक तपशिल किती व्यवस्थित मांडला आहे यावर आहे. यासाठी आज प्रत्येक संस्थातून संगणकाची आवश्यकता भासत आहे. संगणकाच्या स्मृतीत अनेक प्रोग्राम ठेवता येत असल्याने मागील प्रोग्राम व नविन प्रोग्राम याची तुलना करता येते, सांगड घालता येते. परीक्षा पध्दती, परीक्षा निकाल, प्रवे श देणे इत्यादीसाठी संगणकाचा हरघडी उपयोग होतो. वेळेची व शक्तीची बचत होते. मात्र काही वेळा संगणकाच्या कार्यात होणारी छोटीशी चुक दुरूस्त करणे फार क ष्टाचे ठरते. तरीही शैक्षणिक संशोधन कार्यात संगणकाचा उपयोग अतिशय महत्वाचा आहे.

आज तंत्रज्ञान इतके विकसीत झाले आहे कि मानवी जीवनाचा ते एक अविभाज्य अंग बनले आहे. कोणत्याही ऑफीसमध्ये अत्यावश्यक फर्निचर बरोबरच टेलिफोन, झेरॉक्स, टेलेक्स, फॅक्स मशीन या गरजेच्या व अत्यावश्यक बाबी बनल्या आहेत. कॉम्प्युटरने तर मानवी जीवनातली सर्वच क्षेत्रे व्यापलेली आहेत. शिक्षणक्षेत्रही त्यापासून अलिप्त नाही. उलट शिक्षणच्या अभ्यासक्रमात कॉम्प्युटर या नव्या विषयाची भर पडली आहे.या विषयामूळे नोकरीच्या अधिक संधी उपलब्ध होत आहेत. ही स्वागतार्ह गोष्ट आहे. असे नवनवे अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात केल्याशिवाय आपल्यासारख्या विकसनशिल देश विकसीत होणार नाही. शिक्षणप्रकियेत अनेक दृक श्राव्य साधनेही पाठयपुस्तकांइतकीच महत्वपूर्ण ठरलेली आहेत. ही सर्व भौतीक साधने आज शिक्षणक्षेत्राला वरदान ठरली आहेत.

त्यामूळेच संगणक साक्षरता वाढविण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने शाळा पातळीवर आय.सी.टी. ICT योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत सुरूवातीला २५०० शाळांची निवड करण्यात आली होती. केंद्र शासनाच्या सुचना व राज्य

शासनाच्या धोरणानुसार शाळासाठी आय.सी.टी. फेज – २ ही योजना राबविण्यात येत आहे. वापरा व हस्तांतरण करा या तत्वावर आधारीत पाच वर्षासाठी ही योजना आहे. या योजनेत निवड झालेल्या शाळांना १० संगणक संच, प्रिंटर, स्कॅनर, वेब कॅमेरा, प्रोजेक्टर, युपीएस आदी साहित्य देण्यात येत आहे. मे. कोअर प्रोजेक्ट ॲण्ड टेक्नॉलॉजी लि. मुंबई या एजन्सी बरोबर शासनाने संगणक प्रयोगशाळा उभारणीबाबत करार केला आहे. दर तीन महिन्यांनी कार्यान्वितचा अहवाल शाळाकडून संचालनालयाला पाठवावा लागणार आहे.

विद्यार्थ्यांना आजच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी शासनाची हि योजना अंत्यत उपयुक्त आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात निश्चितच भर पडणार आहे. शालेय शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षणात देखील तंत्रज्ञानाच्या वापराबर भर देण्यात येवू लागला. कारण उच्च शिक्षण आणि व्यावसायीक शिक्षण हे प्रत्येक देशात सामाजीक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय बदलाचे प्रमूख साधन बनले. उदयोग जगताला उदयोग चांगल्या प्रकारे चालवण्याची बुध्दीमत्ता आणि वैज्ञानीक कौशल्य असलेल्या मनु यबळाची गरज भासू लागली. याच सुमारास म्हणजे ऐंशीच्या दशकाच्या आसपास कॉम्प्युटरचा प्रसारही वेगाने झाला. माहिती सपंर्क तत्रंज्ञान, संदेश दळणवळण यामूळे विचार एकमेकाकडे पाठविण्याची क्ती साध्य झाली. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील बदलांमूळे तांत्रीक गो टी माणसाच्या कामाचा भाग बनल्या.

येत्या काही वर्षात उच्च शिक्षणाकडे तरूणांचा प्रचंड ओघ सुरू होणार आहे. शिक्षण हा आता बालकांचा अधिकार झाला आहे. महिलासाठी तर पहिली ते पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत झाले आहे. त्याचप्रमाणे समाजातील बदलापासून वंचित असलेल्या घटकासाठीही आता शिक्षण ही महत्वाची गोष्ट बनली आहे. त्यांच्या करता वेगवेगळया माध्यमातून नवनविन दरवाजे खुले होत आहेत. याच जोडीने विज्ञान आणि तंत्रज्ञानात झालेला बदल समजावून घेण्याची शैक्षणिक प्रवृत्तीही महत्वाचा घटक म्हणून समोर आली आहे. भौगोलीक सीमा या फक्त नकाशावर उरल्या आहेत. ज्ञान मिळवणे हाच शिक्षणाचा केंद्रबिंदू ठरू लागला आहे.

त्यामूळे येणाऱ्या काळात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड वाढणार आहे. सध्या एक कोटी तीस लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ही संख्या सन २०२५ पर्यंत शिक्षण हक्क कायदा ६० टक्के यशस्वी ठरला तरी साडेपाच ते सहा कोटी पर्यंत पोहोचेल. इतक्या विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी अध्यापनामध्ये तंत्रज्ञानाचा वापर केला गेला पाहिजे. जगात सर्वत्र विज्ञान व तंत्रज्ञानाच्या वापरामूळे शिक्षण सर्वांना खुले आणि मोफत झाले आहे. आजच्या घडीला आपल्याकडेही ग्रामीण आणि मोठया शहरातंही तरूणाई स्मार्ट फोनच्या आधारे ज्ञान मिळवत आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या कॉलेजांनी आणि विद्यापीठानीही अधिक प्रगल्भ होणे गरजेचे आहे. नविन तंत्रज्ञानाचा वापर हा त्याच्या अध्यापनाचा घटक बनला पाहिजे. त्याच जोडीने नवी कॉलेज आणि विद्यापीठेही निर्माण झाली पाहीजेत.

संदर्भ :–

1- mr.m.wikipedia.org/wiki/
2. Maharashtratimes.com date – 15/01/2019
३. शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन –यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक. EDU - ५२३
४. लोकप्रशासनातील नवप्रवाह – डॉ. प्रीती पोहेकर

Dr. Phad L. H. 9403847070

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal
PEER REFREED & INDEXED JOURNAL

23[nd] March 2019 Special Issue- 168 (II)

# Globalisation: Challenges and Opportunities for India

Chief Editor -
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College.
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editor of This Issue
**Dr. Shivaji Dalnar**
**Principal**
Punyashlok Ahilyadevi Holkar Mahavidyalaya,
Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

Co- Editor of This Issue
**Dr. Bonnar R.Y.**
Dept. of Economics
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

**Prof. Sonner V.B.**
**Dept. of Political Science**
PAH Mahavidyalaya, Ranisawargaon, Tq. Gangakhed , Dis. Parbhani

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) Agriculture & Water Management in Historical Period in India | March 2019 | UGC Approved No. 40705

# Index

1. महिला सशक्तिकरण और ग्रामीण विकास — 11
डॉ.सुनीता श्रीवास्तव
2. विमुद्रीकरण का बेरोजगारी पर हुआ असर एक अध्ययन — 14
प्रा. डॉ. सुर्यकांत पवार
3. भारतीय नक्षलवाद — 16
प्रा. डॉ. सिद्धेश्वर शेटकर
4. "भारतातील नक्षलवाद" — 18
कु. पुजा कमलाकर तिप्पणवोने
5. जागतिकीकरणाचे भारताच्या राजकीय व्यवस्थेवरील परिणाम — 20
सुभाष पोले
6. वाढता दहशतवाद : भारतीय सुरक्षा व्यवस्थे समोरील एक प्रमुख अव्हान — २३
प्रा. सोनवणे जी.एन
7. जागतिकीकरण आणि उच्च शिक्षणापुढील आव्हाने — 25
प्रा. डॉ. विलास तुळशीराम ठाकूर
8. योगातुन आरोग्याकडे — 27
डॉ. फड एल. एच.
9. "जागतिकीकरण आणि राष्ट्रीय सुरक्षेपुढील आव्हाने" — 31
डॉ. बी. डी. तोडकर
10. 'जागतिकीकरण' वास्तव आणि अपरिहार्यता — 35
डॉ.भुजंग विठ्ठलराव पाटील
11. भारतातील दहशतवाद — ३८
गडदरे आनंदा बबन
12. "जागतिकीकरण आणि भारतीय संस्कृती" — ४०
भिकाणे शोभा राजेंद्र
13. भारतातील शेतकरी आत्महत्या कारणे आणि उपाय — 43
प्रा.डॉ. शिवाजी पाते
14. जागतिकिकरण आणि ई–बुक्स — 46
संतोष किर्तनकार
15. जागतिकीकरण आणि सामाजिक समस्या : एक विश्लेषण — 49
प्रा. डॉ. आनेराव एम. एम.
16. जागतिकीकरण आणि दारिद्रय : एक अभ्यास — 52
शंलित सुभाषराव कावळे , प्रा.डॉ. दिपक धारवाडकर
17. जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवर परिणाम — 55
प्रा. डॉ. बी. एस. गुजमुले
18. जागतिकीकरणाचे भारतावरील परिणाम — 58
प्रा. एन.आर. हुरगुळे
19. भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने — 60
प्रा. के.जे. खंदारे
20. 'दहशतवाद' – भारतासमोरील आव्हान
प्रा. रामप्रसाद व्हडगीर

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 168 (II) | March 2019 | UGC Approved No. 40705
Agriculture & Water Management in Historical Period in India

# योगातुन आरोग्याकडे

डॉ. फड एल. एच.
शारीरीक संचालक, कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय,गंगाखेड. जि. परभणी

प्रस्तावना :–

योग आणि योगी हे भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक आहेत. आज सारा भारतच नव्हे तर संपूर्ण विश्व योगमय होताना दिसत असले तरी आपण वैद्यकीय विज्ञानाचे महत्व नाकारू शकत नाही. कारण मनुष्य आणि निसर्ग यांच्यात समन्वय साधण्यासाठी आरोग्य विज्ञान सातत्याने नवनविन संशोधन करीत आले आहे. योगविद्येमूळे माणसाचा मानसिक आणि शारीरिक विकास होतो असा भारतीय योगशास्त्रात सांगितलेल आहे.

आजचे आरोग्य विज्ञान अनेक जिवाणू आणि विषाणूना रोगाचे कारण मानते. सध्याच्या आधुनिक युगात रोगाचे दुसरे महत्वाचे कारण तणाव आहे. शरीरातील सर्व घटकांचे नियंत्रण मज्जासंस्थेद्वारे मेंदूकडून केले जाते. आपल्या हृदयाचे धडकणे, पाचकरस निर्माण होणे, विविध ग्रंथी स्त्रवणे, श्वासोच्छवास करणे, त्वचा किंवा यकृतातून रक्त शुध्द होणे या सर्व कियावर मेंदूचे नियंत्रण असते. मानसिक तणावाखाली असताना शरीरातील या किया पूर्ण क्षमतेने होत नाहीत. त्यामूळे शरीरात विकार निर्माण होतात आणि शरीर रोगी बनते.

देशी आणि परदेशी लोकामध्ये योगाची वाढत जाणारी आवड पाहून विविध प्रकारचे अनेक योगही लोकप्रिय व्हायला लागले आहेत. त्यात प्राणायाम करण्याकडे लोकाचा कल वाढत आहे.

भारतीय परंपरेत योगाच्या नऊ प्रकारचे वर्णन करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. सहजयोग | 2. मंत्रयोग | 3. राजयोग |
| 4. हठयोग | 5. लययोग | 6. ध्यानयोग |
| 7. ज्ञानयोग | 8. भक्तियोग | 9. कर्मयोग |

योगाचा अभ्यास करताना या बाबीची काळजी घेतली तर योगापासून होणारे लाभ अतिशय चांगल्या पध्दतीने मिळवता येतील.

1. अत्याहार :–

म्हणजे खुप जेवण करणे. योग करू इच्छिणारी व्यक्ती अल्पोपहार न करता अत्याहार करीत असेल तर त्याला झोप, आळस, कंटाळा अशा प्रकारचे विकार जडू शकतात. त्यामूळे योगसाधनेत अडचणी येतात.

2. अतिप्रयास :–

अतिप्रयास म्हणजे आपल्या क्षमतेचा विचार नकरता प्रयत्न करणे. साधकाने अशा प्रकारे आपल्या क्षमतेच्या पलीकडे योगाचा सराव केला तर त्यातून हानीच होऊ शकते.

3. प्रजल्प :–

साधकाने खोटं बोलू नये आणि उगीच बढाया मारू नयेत. त्यालाच इथे प्रजल्प म्हटले आहे.

4. अतिनियम ग्रह :–

मर्यादेच्या बाहेर सराव करणे यालाच अतिनियम ग्रह म्हणतात.

5. जनसंपर्क :–

साधक आपला वेळ इतर लोकांशी संपर्क साधण्यात आणि इतर लोकात मिसळून घालवित असेल तर त्यामूळे त्याच्या मनात राग द्वेष यासारखे विकार उत्पन्न होतात आणि त्याच्या साधनेत बाधा येते.

6. चंचलता :–

ज्याचे मन चंचल असते. त्याला आपल्या इंद्रियावरही ताबा मिळवता येत नाही. त्यामूळे मनाची चंचलता योग साधनेत महत्वाची अडचण आहे.

योग आमच्या आयुष्यातील एक पर्याय नाही तर तो आपल्या जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. त्यामूळे योगाचे महत्व समजून घेऊन ते करताना सावधानता बाळगली पाहीजे आणि आरोग्य विज्ञानाची मदत घेऊन पुढे गेले पाहीजे. योग ही रोज आणि नियीमत सराव करण्याची पध्दत आहे.

आजच्या ताणतणावाच्या परिस्थितीत आपले आरोग्य आणि सौंदर्य कायम राखण्यासाठी, रोगापासून मुक्तता मिळविण्यासाठी, कार्यक्षमता वाढविण्यासाठी आपले व्यक्तिमत्व आकर्षक करण्यासाठी, चारित्र्य विकास आणि सकारात्मक विचारांना चालना देण्यासाठी योग करणे हा सुरक्षित आणि विश्वसनिय मार्ग आहे.

योग हा आपल्याला मिळालेला वारसा आहे. भारतामध्ये योगासनाचा अभ्यास हा इ.स. पूर्व पासून केला जात आहे. योगाची उत्पत्ती पांतजली ऋषीने केली आहे.

योग शास्त्रातील व्यायाम हे शास्त्रशुध्द आहेत व ते व्यक्तीचे आरोग्य निरोगी राखणे व रोगापासून मुक्त करणे हया सारखे कार्य करतात.योगाच्या व्यायामात विलक्षण सौंदर्य आणि मोहकता भरलेली आहे. योग आणि शरीर यांचा फार जवळचा संबध आहे. मानवी शरीर हे दोन भागात विभागले आहे. एक म्हणजे बाहय शरीर दुसरे म्हणजे अंतर्गत मन आणि आत्मा यांना रोगग्रस्त व्याधीपासून बचाव करणे. योग आणि मन यांचा सुध्दा जवळचा संबध आहे. व त्यामूळे तो मनाने प्रसन्न राहतो. म्हणजे निरोगी शरीरात निरोगी मन राहत असते. व्यक्तिला दैनदिन जीवन जगण्यासाठी शारीरीक बलाची आवश्यकता असते. ज्या व्यक्तिला स्वतःची उन्नती, प्रगती करून घ्यावयाची असेल अशा व्यक्तिने आपले शरीर निरोगी आणि कारक बनविले पाहीजे.

**योग म्हणजे काय ?**

योग हा शब्द युज धातूपासून बनला आहे. योग म्हणजे शरीर, मन आणि आत्मा हया सर्वांना ईश्वराशी जोडणे होय. योग म्हणजे व्यक्तिचे त्याच्या आत्मशक्तीशी मिलन होय.

"योग म्हणजे बुध्दी, मन, भावना आणि संकल्प यांचे नियमन होय."
"सत्य, ईश्वर यांचे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा मार्ग म्हणजे योग होय."
"व्यक्तिचा विकास साधणे व भौगोलिक आणि आध्यात्मिक जीवन संपन्न करण्याची प्रकिया म्हणजे योग होय."

योगाद्वारे व्यक्तिला ज्ञान प्राप्त करता येते व ज्ञानामूळे अंतरंग अनुभुती प्राप्त होत असते. व्यक्तिला मोक्षापर्यंत जाण्यासाठी शारीरीक क्षमता, मानसिक संतूलन, बुध्दी कौशल्य व आत्मजागृती आवश्यक आहे. व योग अभ्यासाने व्यक्ति जीवनात अंत्यत तृप्त, समाधानी, निरामय, निरोगी आणि सुख प्राप्त करून देण्याचे साधन आहे. मानवाचा सर्वांगाने विकास साधणारे व खऱ्या अर्थाने जीवन संपन्न करणारे शास्त्र आहे.

योगाचे स्वरूप :–

योग आपल्याला आपल्या पुर्वजाचा मिळालेला अनमोल असा साठा आहे.

1. दैनंदिन जीवनात योगाची आवश्यकता :–

व्यक्तीचे जीवन हे यंत्रांच्या पलीकडे झाले आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत त्याला घड्याळाच्या काट्यावर आपले जीवन जगावे लागते. आणि या सर्वांतून स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष पुरविण्यासाठी वेळ मिळत नाही. व त्यामूळे आरोग्य निरोगी राहणे कठीण असते. त्यासाठी व्यक्तीला दैनंदिन जीवनात योग करावयास हवा.

2. सुखी जीवनाचा राजमार्ग :–

व्यक्ती नेहमी सुख प्राप्तीसाठी धडपड करीत असतो. परंतु जो पर्यंत सुख म्हणजे काय आणि दुःख कशाला म्हणावे हे समजणे आवश्यक आहे. व्यक्तीने चंचल मनाला स्थिर करून सुख शोधले पाहीजे. इतकेच नव्हे तर व्यक्ती सदैव काही न काही मिळविण्यासाठी मग्न असतो व ते मिळाले नाही की दुःखी होतो.

3. जीवनात समृध्दता निर्माण करणे :–

ज्या वेळेस व्यक्ती सुख आणि दुःख यांच्या पलीकडे विचार करतो. त्याला गितेत स्थित प्रज्ञ हा शाश्वत सुखाचा मार्ग दाखवणारे दिपस्तंभ आहे.

4. योगाद्वारे शरीर व मनाचा विकास :–

योगामध्ये शरीराबरोबर मनाचाही विचार केलेला आहे. शरीर व मन हे एकमेकावर परीणाम करणारे व अविभाज्य असे घटक आहेत. शरीराचा मनावर जेवढा परीणाम होतो त्यापेक्षा काहीतरी अधिक परीणाम हा मनाचा शरीरावर होतो.

5. योग हे प्रत्यक्ष कृतीचे शास्त्र आहे :–

योग म्हणजे केवळ तात्वीक चर्चा करून समजावून घेण्याचे शास्त्र नाही. योग हा शरीराने व मनाने प्रत्यक्ष कृती करून जीवनात अमंलात आणावयाचे शास्त्र आहे. योगामध्ये आसने आणि प्राणायाम व किया ही लोकप्रिय अशी अंगे आहेत.

योगाची व्याप्ती :–

योगामूळे मनुष्य जीवनामध्ये उन्नती, विकास साधण्यासाठी आणि सुख प्राप्त करण्यासाठी योग महत्वपूर्ण आहे. योगाकडे आज बरेच लोक आकर्षीत होत आहेत. तर काही देशात योग हा मनुष्याला निरोगी राखण्याचे शास्त्र असल्यामूळे आदराने पाहीले जात आहे. योगाचे खरे स्वरूप सामान्य माणसापर्यंत पाहोचणे गरजेचे आहे.

1. योग व शरीर :–

मनुष्याला आपले दैनदिन कार्य सुरळीत पार पाडण्यासाठी शरीर हे चांगले असणे आवश्यक आहे. शरीर चांगले राहण्यासाठी शरीरातील असणाऱ्या विविध संस्थाचे कार्य व्यस्थित चालणे आवश्यक असते.

2. योग व शरीररचना शास्त्र :–

आपले शरीर चांगले राहण्यासाठी आपल्याला आपल्या शरीराचे ज्ञान असणे फार गरजेचे असते.

3. योग व मन :–

व्यक्ती जर आरोग्यवान असेल तर मनानेही प्रसन्न राहते व जीवनात यशस्वी होतो. निरोगी शरीरात निरोगी मन राहत असते. शरीर आणि मन जर निरोगी असेल तर मनुष्य भौतीक सुखे संपादन करण्यास पात्र ठरतो.

4. योग व आहार :–

मनुष्याला जीवत राहण्यासाठी प्रामुख्याने तीन गोष्टीची आवश्यकता आहे. हवा, अन्न, पाणी यावरच मनुष्याचे जीवन आहे.,

5. योग व उपचार :–

आजच्या धकाधकीच्या यंत्रयुगात मनुष्यावरचा ताण वाढलेला आहे. इतकेच नव्हे तर मनुष्याची रोग प्रतिकारक शक्ती दिवसेंदिवस कमी होत आहे. रोगी व्यक्तीला रोगापासून मुक्त करण्यासाठी योगाचा उपचार म्हणून उपयोग केला जात आहे.

6. योग व शारीरीक शिक्षण :–

व्यक्तिचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षण पध्दती म्हणजे शारीरीक शिक्षण होय. व्यक्तीचे शारीरीक मानसिक आरोग्य चांगले राखणे व देशाचा आदर्श नागरीक बनविणे हे शारीरीक शिक्षणाचे ध्येय आहे.

अष्टांग योग :–

योग हा वैदीक जीवनाचा भारताला मिळालेला अमुल्य असा ठेवा आहे. योग म्हणजे जीवन उत्तम तऱ्हेने जगण्याचा एकमेव मार्ग आहे., आणि यात मानवी प्रकृतीचे तीन भाग सांगण्यात आले आहेत.

1. सत :–

म्हणजे सात्विक गुण यामध्ये व्यक्तीच्या ठिकाणी आंतरीक बळ निर्माण होते.

2. रज :–

राजस्व गुण होय. यात व्यक्तीच्या ठिकाणी शक्ती तयार होते.

3. तम :–

यात तामसीक वृत्ती ही जास्त असते व त्यातून उर्जा निर्माण होते.

या तीन घटकावर व्यक्तीचे वर्तन आणि स्वभाव अवलंबून असतो. पांतजलीने परमात्म्याच्या प्राप्तीसाठी असलेल्या साधनाचा उल्लेख योगाच्या आठ अंगाच्या स्वरूपात केलेला आहे. त्यातून अष्टांग योग म्हणून प्रसिध्द आहे.

1. यम :–
यमाद्वारे सर्व जीवनाला नियंत्रीत करता येते. यमाचे दहा अंग आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, क्षमा, दया, वृत्ती, आर्जव, मिलाहार, शौच.

2. नियम :–
यामध्ये शरीराची निगा, प्रत्यही स्नान, आहार विषयक नियमांचे पालन करणे.

3. आसन :–
यामध्ये डोके, खांदे, कबंर सरळ ठेवणे म्हणजे आसन त्यामूळे पाठीचा कणा मोकळा राहतो.

4. प्राणायाम :–
यात श्वसनामार्फत प्राणावर प्रभुत्व मिळविण्याची क्रिया आहे.

5. प्रत्याहार :–
यात मनाला अंतर्मुख करण्याकरीता इंद्रिय व विषय यांच्या प्रभुत्वाखालून मन काढून त्याचा उध्दार करणे.

6. धारणा :–
धारणा ही एक अशी अवस्था आहे की ज्यामध्ये मनाला एकाग्र करून पुर्ण तल्लीनतेची अवस्था प्राप्त करणे होय.

7. ध्यान :–
मनुष्याला कार्य करण्यासाठी व त्यातील यशस्वीतेसाठी ध्यानाची फार आवश्यकता असते.

8. समाधी :–
जीवनातील समाधी ही एक अशी अवस्था आहे की, ज्यामार्फत व्यक्ती बाहय शरीरातून मुक्त होऊन स्वतःला ईश्वरात सम्मीलीत करण्याची अवस्था आहे.

आसने :–
आसनाच्या अभ्यासामूळे जसे मानसीक स्वास्थ्य व शारीरीक स्वास्थ्य लाभते तसेच काही प्रमाणात रोग मुक्ती ही मिळू शकते. आसनाची व्याख्या :– "मन आणि शरीर स्थिर करण्यासाठी शरीराची केलेली विशिष्ट स्थिती म्हणजे आसन होय."

"विशिष्ट पध्दतीने आणि विशिष्ट हेतूने अंतीम स्थितीत स्थिर होण्यासाठी शरीराच्या विविध भागाची केलेली अनियंत्रीत अशी हालचाल म्हणजे आसन होय."

आसनाचे प्रकार :–
1. उभ्या स्थितीमधील आसनं
2. बसलेल्या स्थितीमधील आसनं
3. पाठीवरझोपून करावयाची आसनं
4. पोटावरझोपून करावयाची आसनं
5. डोक्यावर करावयाची आसनं

प्राणायाम :–
मनुष्य दैनंदिन जीवनात अनेक चिंतानी ग्रासलेला असतो. योगी व ऋषी मुनीनी चिंतेवर विजय मिळविण्याकरीता तसेच चित्तवृत्तीचा निरोध करण्यासाठी या क्रियांचा उपयोग करून योग शास्त्रात प्राणायामाची निर्मीती केली आहे. मानवी जीवनात प्राण हा अमृतासमान आहे, आणि अमृताचे कार्य हे जीवनदान देणे आहे.

"अग्नी दिव्यामूळे जशी सर्व प्रकारच्या धातूची अशुध्दी नष्ट होते, तसेच प्राणायामामूळे सर्व इंद्रियाचे दोष पाप भस्म होऊन जातात."

प्राणायामाचे प्रकार :–
1. सुर्यभेदन :– आतड्याचे रोग दुर होतात
2. सितकारी :– शरीरातील उष्णता कमी होते.
3. उज्जायी :– उष्णता कमी होते.
4. शितली :– विषबाधा होत नाही.
5. भस्त्रीका :– गळयाची सुज कमी होते.
6. भ्रामरी :– चित्त प्रसन्न होते.
7. मुर्च्छा :– निरामय आनंद प्राप्त होतो.
8. फलाविनी :–

शिफारसी :–
1. तणावग्रस्त व्यक्तींना योगाकडे आकर्षीत केले पाहीजे.
2. योग शिबीराचे आयोजन केले पाहिजे.
3. शालेय स्तरापासून योग अनिवार्य.
4. आहारात समतोल राखला पाहीजे.

योग व प्राणायामाचे फायदे :–
1. शारीरीक सुदृढता वाढते.
2. मानसिक सुदृढता वाढते.
3. सामाजिक विकास होतो.

# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640

*Special Issue*

Approved By UGC Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98


UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019


**Volume-II, February 2019 (Special Issue)**


म.शि.प्र. मंडळाचे
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
University Grants Commission


❖ EDITOR IN CHIEF ❖

DR. M. RAGHIB DESHMUKH

❖ GUEST EDITOR ❖

DR. BALASAHEB JADHAV



www.scholarsimpact.com


Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Munde Art's Col
Gangakhed Dist.Parbha

: Organised by :

**Department of Political Science**

M.S.P. Mandal's

**SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.**

UGC - College with Potential for Excellence    NAAC Accrediated A+Grade (Third Cycle)
(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

| | | |
|---|---|---|
| 71. | सामाजिक आणि आर्थिक विकासात निती आयोगाची भूमिका<br>डॉ. योगेश अ. पाटील | 238 – 240 |
| 72. | भारतीय लोकशाहीतील समस्या: भ्रष्टाचार<br>डॉ. रेखा रामनाथ बने | 241 – 244 |
| 73. | भारतीय लोकशाहीसाठी राज्यघटनेतील दुर्गाबाई देशमुख यांचे योगदान<br>डॉ. नितीन बावळे, कु. मयुरी पुरजळकर | 245 – 247 |
| 74. | भारतीय लोकशाहीचा इतिहास एक दुष्टीक्षेप<br>प्रा. डॉ. बिडवे टी. एस | 248 – 251 |
| 75. | भारतीय लोकशाही आणि सुशासन: वर्तमान सरकार<br>डॉ. प्रमोद चव्हाण | 252 – 254 |
| 76. | भारतीय लोकशाही आणि प्रादेशिकतावाद<br>प्रा. डॉ. प्रल्हाद दत्तात्रय दुधाने | 255 – 258 |
| 77. | भ्रष्टाचार एक जागतिक समस्या<br>प्रा. विजय मुरलीधर गावंडे | 259 – 261 |
| 78. | भारतीय लोकशाहीचा ऐतिहासिक आढावा<br>प्रा. डॉ. विलास कऱ्हाळे | 262 – 264 |
| 79. | स्थानिक संस्थामधील महिला नेतृत्वाच्या समस्या<br>प्रा. डॉ. प्रविण लोणारकर | 265 – 267 |
| 80. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>डॉ. सौ. कल्पना मा. कदम, संगिता विश्वनाथ पोपलवार | 268 – 270 |



Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

(72)

# भारतीय लोकशाहीतील समस्या : भ्रष्टाचार

डॉ. रेखा रामनाथ बने
सहायक प्राध्यापिका (राज्यशास्त्र विभाग)
कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय,
गंगाखेड. जि. परभणी. पिन कोड –431514

जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ख्याती आहे. लोकशाही शासनव्यवस्थेत स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वांची प्रस्थापना अभिप्रेत असते. लोकशाही याचा शब्दशः अर्थ लोकांची सत्ता असा आहे. लोकशाहीत राजकीय सत्ता ही एखाद्या व्यक्तिची किंवा गटाची मक्तेदारी नसते. तर लोकांच्या राजकीय प्रकियेतील सहभागाला समान संधी देण्यात यावी यासाठी असते. प्राचीन ग्रीक विचारवंत हेरोडोटस याने लोकशाहीची व्याख्या करताना म्हटंले आहे की, "ज्या समाजात समान हक्क असतात आणि जिथे राज्यकर्ते आपल्या कृत्याबद्दल जबाबदार असतात, असा समाज म्हणजे लोकशाही होय."

लोकांचे हित साध्य करणे हे लोकशाही शासनाचे उद्दिष्ट असते. राज्यासाठी लोक नसून राज्य हे लोकांसाठी आहे, हे लोकशाहीचे ब्रिदवाक्य आहे. अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिकंन यांनी "लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांकडून चालविलेले शासन" असे वर्णन केलेले आहे. म्हणजेच लोकशाही शासन हे लोकांसाठी लोकांनी चालविलेले शासन आहे. मतदार, पक्ष, कार्यकर्ते, पक्षनेते, लोकप्रतिनिधी अशा विविध भुमिका लोक पार पाडून राजकीय प्रकियेत सतत सहभागी होत असतात. लोकशाहीत राज्यकर्ते हे जनतेचे प्रतिनिधी असून अंतिमतः जनतेला जबाबदार असल्यामूळे लोकांच्या इच्छेचे प्रतिबिंब शासनाच्या धोरणामध्ये दिसून येते.

अर्नेस्ट बार्कर यांनी म्हटले की, "लोकशाही हे एक विशेष प्रकारचे चैतन्य असते. ती एक मानसिक प्रवृत्ती असते, तेच लोकशाही व्यवस्था यशस्वी करू शकतात." मात्र भारतासारख्या लोकशाही गणतंत्रात अनेक समस्या अडसर बनत चालल्या आहेत. भारतीय घटनेने स्थापित केलेली लोकशाही आणि आजची लोकशाही यात बरेचशे अंतर पडले आहे. लोकांनी लोकांसाठी स्थापित केलेली सत्ता म्हणजे लोकशाही आज राहिली नाही. त्याजागी सत्ताप्राप्तीसाठी साम–दाम–दंड–भेदाचे सारेच प्रकार सत्ताधारी व विरोधक वापरत आहेत त्यामूळे लोकशाहीचे अस्तित्व धोक्यात आले. जात, धर्म, भाषा, प्रांत, भ्रष्टाचार, हिंसाचार, दहशतवाद, नक्षलवाद यासारख्या अनेक समस्यांच्या ग्रहणात लोकशाही अडकलेली आहे.

आज भारतीय लोकशाहीला मारक ठरणाऱ्या अनेक समस्यापैकी प्रमुख असणारी समस्या भ्रष्टाचार आहे. प्रस्तूत शोध लेखात लोकशाहीतील भ्रष्टाचाराचा धोका, त्याची कारणे आणि उपाययोजना यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे :–

1. लोकशाही शासनव्यवस्थेचा जनहिताच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे.
2. लोकशाहीच्या निकोप वाढीतील अडसर असलेल्या भ्रष्टाचाराची समस्या जाणून घेणे.
3. भ्रष्टाचाराची कारणे जाणून उपाययोजना सुचविणे.

गृहीतकृत्य :–

1. लोकशाही विकासातील भ्रष्टाचार एक समस्या बनली आहे.
2. भ्रष्टाचार निमुर्लनात जनसहभाग व कायद्याचे महत्व आहे.

संशोधन पध्दती :–

प्रस्तुत शोध लेख दुय्यम स्त्रोतावर आधारित असून त्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे.

भारतासारख्या लोकशाही गणतंत्र देशात भ्रष्टाचार आज शिष्टाचार झाला आहे. देशातील प्रत्येक क्षेत्र भ्रष्टाचाराने व्यापलेले आहे. भ्रष्टाचाराच्या रूपाने निर्माण झालेला काळा पैसा दिवसागणिक वाढत आहे. भ्रष्टाचार

म्हणजे स्वीकृत मुल्यांच्या विरूध्द जे आचरण केले जाते त्याला भ्रष्टाचार असे म्हणतात. भ्रष्टाचार हा शब्द भ्रष्ट + आचरण या दोन शब्दापासून बनलेला आहे. व्यक्ति, संस्था, न्याय, नितिमत्ता, सत्य, धर्म तथा सामाजिक, मानवीय राष्ट्रीय मुल्यांच्या विरूध्द कार्ये करतात. प्रत्येक देशाची आपली संस्कृती, सभ्यता तथा चरित्र असते. ज्याआधारे देशाची ओळख होत असते. भारत देश हा सत्य, ईमानदारी, अहिंसा, धार्मिकता, नैतिक मुल्यें तथा मानवतावादी गुणामूळे जगात एक वेगळी ओळख निर्माण करू शकतो. मात्र सद्य स्थितीत भारत स्वतःची संस्कृती सोडून भ्रष्ट मार्गाने वाटचाल करत आहे.

भारताची ओळख ही सर्वाधीक भ्रष्ट देशापैकी एक अशी झाली आहे. सन 2017 ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल या संस्थेच्या मते जगातील सुमारे 177 देशामंध्ये भारताचा कम  81 वा तर फोर्ब्स सर्वेत आशिया खंडातील पाच राष्ट्रात भारताचा प्रथम क्रमांक आहे. या पार्श्वभूमीवर जर आपल्याला कोणी असे सांगीतले भारतात भ्रष्टाचार विरोधी यंत्रणा फार मोठया संख्येने अस्तित्वात आहेत. तर ती चेष्टा वाटेल किंवा आतीशयोक्ती वाटेल. देशहिताची, जनसेवेची तळमळ असणारा कर्तत्ववान उच्चशिक्षीत उमेदवार निवडून देण्याऐवजी भ्रष्टाचारी, अकार्यक्षम, चारित्र्यहीन उमेदवार जनता निवडून देते. अशा वेळी लोकशाहीची वाटचाल यशस्वी कशी होईल.

भ्रष्टाचाराच्या प्रकरणामध्ये 1960 च्या दशकात मोठया प्रमाणात वाढझाली. म्हणूनच लोकपाल विधेयक मंजूर करण्याच्या दृष्टीकोनातून अण्णा हजारे यांनी जोरदार प्रयत्न करून ते मंजूर करण्यात यशस्वी झाले. भ्रष्टाचाराच्या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्याच्या दृष्टीने प्रश्न केला तर त्या प्रश्नाचे उत्तर असे असेल की राजकारणी मंडळी भ्रष्टाचार करतात. सरकारी कचेऱ्यामध्ये हजारों खेटे घालणाऱ्या नागरिकांना विचारले तर ते प्रशासनाकडे बोटे दाखवतील. कितीतरी अधिकाऱ्याच्या अधिकृत उत्पन्नाचा त्यांच्या मालमत्तेशी कधीच मेळ जुळत नाही. राजकारणी लोकांची जीवनशैली पाहता त्यांना रोज कोणती लॉटरी लागते का वाटते. व्यवसायातील संवेदनक्षम माहीतीगारांना विचारले तर ते आपल्या व्यवसायातील भ्रष्टाचाराच्या कहाण्या सांगतील. सैन्यदले, न्यायसंस्था म्हणजे सर्वच संस्था आणि क्षेत्रे भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकलेली आहेत आणि तरीही सर्वांचाच भ्रष्टाचाराला विरोध असल्याचे दिसते. हा विरोधाभास जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता संस्था निहित हेतूप्रमाणे चालविणे आणि कायदे नियम यांची वैयक्तिक निरपेक्ष अमलबजावणी करणे या मुलभूत कौशल्यात आपण कमी पडतो. भ्रष्टाचार विरोधी कायदे, केंद्रीय दक्षता आयोग, सीबीआय, न्यायसंस्था यासारख्या यंत्रणा काम करत आहेत. मात्र त्यांचा म्हणावा तितका परीणाम पडत नसल्याचे जाणवते. कारण यंत्रणा स्थापन करायच्या, कायदे करायचे आणि मग त्यांचा कारभार रामभरोसे सोडून द्यायचा किंवा त्यांच्या अमंलबजावणीत हेराफेरी मोठया प्रमाणात चालते. शासनाच्या कल्याणकारी योजना खुप आहेत. परंतू त्या त्यांच्यापर्यंत पोहोचणे आवश्यक असते.

स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीतील प्रमुख घोटाळयांचा आढावा घेतला असता यादीचा आलेख खुप मोठा आहे. तो खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

| घोटाळा | वर्षे | आकडा |
|---|---|---|
| जीप खरेदी | 1948 | 80 लाख |
| मुंद्रा मैस | 1958 | 1.2 करोड |
| तेजा ऋण | 1960 | 22 करोड |
| कुओ ऑयल डील | 1976 | 13 करोड |
| एचडी. डब्लू दलाली | 1987 | 20 करोड |
| बोफोर्स घोटाळा | 1987 | 64 करोड |
| सिक्योरिटी स्कॅम | 1992 | 5000 करोड |
| इंडियन बॅक | 1992 | 13000 करोड |
| चारा घोटाळा | 1996 | 950 करोड |
| स्टॉक मार्केट | 2002 | 115,000 करोड |
| सत्यम घोटाळा | 2008 | 14,000 करोड |
| मनी लांडरिंग | 2009 | 4000 करोड |
| युरिया घोटाळा | 1996 | 133 करोड |
| कोयला घोटाळा | 2010 | 1.86 करोड |

भ्रष्टाचाराच्या वर उल्लेख केलेल्या यादीचा विचार करू लागल्यास सामान्य माणसांला स्वतःच्या दैनदिन जीवन जगण्यासाठी पावलो पावली लाच देण्यावाचून गत्यंतर नाही का काय हा प्रश्न पडत चालला आहे. आपल्या देशातील भ्रष्टाचार व्यवस्था दीर्घकाळ टिकून राहणार की काय असे वाटू लागले आहे. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी अनेक कायदे व यंत्रणा उपलब्ध आहेत मात्र या उपायाची दिशा अजूनही सापडली नाही. उजळ माथ्याने फिरणाऱ्या भ्रष्ट व्यक्तिला न्यायालयात खेचणे कठीण होत चालले आहे. किचकट कायद्यांचा अन्वयार्थ शोधणे, न्यायालयाचा वेळकाढूपणा, आरोप सिध्द झाल्यास मिळणारी जुजबी शिक्षा यामूळे भ्रष्टाचाराविरूध्द एकएकटयाने लढणे अशक्यातील गोष्ट ठरत आहे. तत्वासाठी त्याग व दुःख झोलण्याइतका कणखरपणा सामान्य माणसांच्या कुवतीच्या बाहेर असल्यामूळे प्रामाणिक माणूस सुध्दा नाइलाजाने भ्रष्टाचारात सहभागी होत आहे.

एकंदरीत असे असले तरी भारतात भ्रष्टाचार विरोधी अनेक कायदे, यंत्रणा, चळवळी, समाजसुधारणा कार्य यासारख्या उपाययोजनाही मोठया प्रमाणात उपलब्ध आहेत.सध्या सत्तेत असलेल्या सरकारने भ्रष्टाचार विरोधी मोहिम हाती घेतल्याने एक आशादायी किरण जनतेत निर्माण झाला आहे. देशातील प्रत्येक व्यवहार हा ऑनलाइन केलेला असल्यामूळे वेळकाढूपणा, अनागोंदी, विनाकारण होणारा खर्च यासारख्या घातक बाबीस आळा बसला आहे. त्यामूळे शासनाच्या योजनाचा लाभ थेट जनतेच्या पदरी पडत आहे. स्वीस बॅकेतील काळा पैसा परत आणण्याची मोहिम काही प्रमाणात का होईना पण अमलात आली. त्यामूळे काळा पैसा जमा करण्याच्या बिनधास्त प्रवृत्तीवर जरब बसला. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीने जी –20 देशांच्या बैठकीनिमीत्तांने परदेशात असलेल्या काळया पैसाबाबत आम्हाला आणखी जागतिक सहकार्याची अपेक्षा व्यक्त करून बॅकिंग क्षेत्रातील अतिगोपनियता काढून टाकून करविषयक सामायिक माहिती देवाणघेवाण व्यवस्था राबविण्यास सुरूवात केली. बेहिशोबी मालमत्तेबाबत परदेशातील पैशाबाबत आम्ही एक कायदा केला असून, अनेक देशांशी द्विपक्षीय करार करून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. 18 मार्च 2015 अखेर भारतासह 58 क्षेत्रात माहिती देवाणघेवाणीची यंत्रणा निर्माण केली आहे. 2018 मध्ये आणखी 36 क्षेत्रांशी देंशाबरोबर अशी यंत्रणा अस्तित्वात आणली. त्याचबरोबर ज्या देशाबरोबर अशा व्यवस्था अस्तित्वात नाहीत त्यांच्याबरोबर त्या निर्माण करण्यासाठी आर्थिक कृती कामगिरी दल स्थापन केले. याशिवाय शासनाच्या योजनाचा लाभ असो की दैनंदिन व्यवहार हा आता ऑनलाइन केल्यामूळे भ्रष्टाचाराच्या मार्गास प्रतिबंध बसत आहे. मात्र हा प्रतिबंध घोटाळाच्या तुलनेत जुजबी ठरत असल्यामूळे भ्रष्टाचारावर म्हणावा तसा प्रतिबंध घालण्यात भारतीय लोकशाही व्यवस्था यशस्वी होताना दिसत नाही.

कारण या सत्तेतील सरकारने एकीकडे आशादायक पाऊले उचललेली दिसत असली तरी दुसरीकडे भ्रष्टाचाराच्या घटना ही वाढलेल्या आहेत. नीरव मोदी बॅक घोटाळा, मेहूल चोकसी, राफेल घोटाळा, खाण आबंटन घोटाळा, मध्यप्रदेश व्यापम घोटाळा, छत्तीसगडचा 36000 करोडचा चावल घोटाळा, राजस्थानचा माइन्स घोटाळा, पंजाबचा 12000 करोड गेहू घोटाळा, मनुस्मृती का बुक्स घोटाळा, ललीत गेट यासारखी यादी आहे. त्यासाठी उपाययोजनाच्या अमलबजावणीसाठी अधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

उपाययोजना :–

- देशातील सामान्य लोकापर्यंत कायद्याची ओळख करून देणे आवश्यक आहे.
- कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे जेणेकरून लोकांमध्ये विश्वासार्हता वाढेल.
- असे झाले तर प्रत्येकजण कोणालाही लाच न देता आपली कामे करण्यास सुरूवात करेल.
- प्रशासकिय कामात पारदर्शकता येण्यासाठी वचक निर्माण करणे आवश्यक आहे.
- न्यायालयीन प्रकिया जलद व विनाखर्चीक होणे आवश्यक आहे.
- लेकपाल व माहिती अधिकारासारखे कायदे प्रशासकिय कामात आपली भुमिका कठोर पध्दतीने वठवणे आवश्यक आहे.
- कायद्याच्या अंमलबजावणीसाठी लोकांची मानसिक तयारी पुर्णपणे झाली पाहिजे.

# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual
Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640

*Special Issue*

Approved By UGC
Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98


UGC (CPE) Sponsored
One Day Interdisciplinary National Level Conference
on

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

16th February 2019

**Volume-I, February 2019 (Special Issue)**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
University Grants Commission


✤ EDITOR IN CHIEF ✤

## DR. M. RAGHIB DESHMUKH

✤ GUEST EDITOR ✤

## DR. BALASAHEB JADHAV



Principal
Late. Sow. Shashaba
Sitaram Mundhe Art's Co
Gangakhed Dist. Parbh


www.scholarsimpact.com

: Organised by :

## Department of Political Science

M.S.P. Mandal's

## SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.

UGC - College with Potential for Excellence NAAC Accrediated A+Grade (Third Cycle)
(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

| | | |
|---|---|---|
| 61. | दहशतवाद : भारतीय लोकशाही पुढील आव्हान<br>प्रा. औचित्ये बी.सी. | 218-223 |
| 62. | बहुसंख्यांच्या धार्मिक जातीय विळख्यात भारतीय लोकशाही<br>डॉ. आर.व्ही. मस्के | 224-226 |
| 63. | भारतीय लोकशाही आणि आतंकवाद : विशेष संदर्भ जम्मू आणि काश्मीर<br>राजेश जोंधळे | 227-230 |
| 64. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा डॉ दत्ताजी मेहत्रे | 231-235 |
| 65. | भारतीय लोकशाही आणि संविधानिक मूल्य<br>प्रा. डॉ. एम. एफ. राऊतराहे | 236-238 |
| 66. | भारतीय लोकशाही पुढील आव्हान : प्रादेशिकता<br>संभाजी तांबे | 239-242 |
| 67. | भारतीय लोकशाही : संवैधानिक मूल्ये आणि वास्तव<br>डॉ. फोले एस. के. | 243-247 |
| 68. | भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार<br>प्रा. राजा मनोहर इंगळे, प्रा. किशोरकुमार मनोहर इंगळे | 248-251 |
| 69. | सोशल मिडियाचा वापरकर्त्यांवर होणारा प्रभाव-बारामती शहरातील वापरकर्त्यांचा अभ्यास<br>देविदास विजय भोसले | 252-254 |
| 70. | भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार<br>प्रा. भोसले वैशाली भानुदास | 255-257 |



Principal
Late Sow. Sheshabai Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist. Parbhani

(61)

# दहशतवाद : भारतीय लोकशाही पुढील आव्हान

**प्रा. औचित्ये बी.सी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
कै.सौ. शेषाबाई सी. मुंढे कला
महाविद्यालय, गंगाखेड. जि.परभणी

**प्रस्तावना :**

आज लोकशाही हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय शासन प्रकार आहे. जगातील बहुसंख्य देशांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. लोकशाही ही केवळ एक शासन पद्धती नव्हे तर ती एक जीवन पद्धती आहे. आपला भारत देश हा जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखला जातो. भारत देशास लोकशहीची परंपरा नसली तरीही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने प्रजासत्ताक गणराज्य पद्धतीचा स्वीकार केला व आजपर्यंत ही लोकशाही टिकवून ठेवली हे कौतुकास्पद आहे. भारतीय लोकशाहीची जडण-घडण वेगवेगळ्या विचारांतून झालेली आहे. हजारो वर्षांपासून एका मर्यादित चौकटीत असणारी जळमट विचारसरणी दूर सारुन त्याजागी एक नवीन लोक कल्याणकारी अशी लोकशाही सध्या भारतात रुजली आहे.

आज भारतीय लोकशाहीने सात दशकांपेक्षा अधिकचा प्रवासक केलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वतंत्र् राज्यघटना स्वीकारुन लोकशाहीची घडी बसविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. राज्यघटनेने स्वातंत्र्य, समाता, बंधुता, न्याय व धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करुन भारत हे एक सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य घोषीत केले आहे.

जी शासन पद्धती जनतेच्या संमतीवर आधारलेली असते. ज्यात नागरिकांना आचार, विचार, उच्चार व मुद्रण स्वातंत्र्य असते व राज्यकारभार हा जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत चालतो त्यास लोकशाही शासन पद्धती असे म्हणता येते. लोकशाही ही संकल्पना मुळची ग्रीक मधील होय. ख्रिस्तपूर्व काळात ग्रीक नगरराज्यांमध्ये लोकशाही शासन पद्धती होती. लोकशाहीला इंग्रजीमध्ये Democracy असे म्हणतात. हा शब्द ग्रीक भाषेतील Demos (जनता) Cratia (सत्ता) या शब्दापासून तयार झाला आहे. म्हणजेच जनतेची सत्ता म्हणजे लोकशाही होय. ब्रिटीश राजवटीच्या जोखडातून मुक्त झाल्यानंतर भारताने पण लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. लोकशाहीची परंपरा नसणाऱ्या भारत देशात हा शसन प्रकार रुजविणे तसे कठीणच होते. मात्र भारतीय जनतेने लोकशाहीवरील आपली निष्ठा वेळोवेळी सिद्ध करुन हा शासन प्रकार यशस्वी करण्याचा प्रयत्न केला आहे.

आज भारतीय लोकशाही समोर, जातीयता, प्रादेशिकवाद, भ्रष्टाचार, राजनितीक, अध:पतन, नक्षलवाद व दहशतवाद अशी अनेक आव्हाने उभी आहेत. त्यापैकी दहशतवाद हे एक महत्वाचे आव्हान आहे. प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय लोकशाहीचे स्वरुप व त्या पुढील दहशतवादाचे आव्हान, दहशतवादाचे स्वरुप व दहशतवाद निर्मुलन करुन भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठीचे उपाय यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**अभ्यास विषयाचे महत्व :-**

भारताने स्वातंत्र्य लढ्याच्या माध्यमातून स्वातंत्र्य प्राप्त केले व भारतात लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. आज भारतीयांसाठी लोकशाही ही शासन पद्धती राहिली नसून ती जीवन पद्धती बनली आहे. मात्र स्वातंत्र्यानंतर या लोकशाही शासन पद्धतीपुढे अनेक आव्हाने निर्माण झाली त्यापैकी दहशतवाद हे प्रमुख आव्हान आहे. या दहशतवादामुळे मानवी हक्कांची पायमल्ली होत आहे. देशाच्या अखंडतेस व सार्वभौमत्वास मोठा धोका निर्माण झाला आहे. ही लोकशाही शासन पद्धती टिकवून ठेवायची असेल तर मोठ्या प्रमाणात समाज प्रबोधन होणे आवश्यक आहे. लोकशाहीचा हा नंदादीप अखंड तेवत रहाणे आवश्यक आहे. यासाठी या विषयांवर चर्चा होणे महत्वाचे वाटते.

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये:**

१) भारतीय लोकशाहीचे स्वरुप समजावून घेणे, त्याचा ऐतिहासिक आढावा घेणे.
२) भारतातील दहशतवादाचे आव्हान व त्याचे स्वरुप यांचा अभ्यास करणे.
३) लोकशाहीचे संवर्धन करणे व दहशतवाद निर्मुलनाचे उपाय शोधणे.
४) वर्तमान समाजात लोकशाही संवर्धनाबाबत जागृती निर्माण करणे.

**गृहितके :**

१) भारतास लोकशाहीची परंपरा नसली तरीही आज भारतात ही शासन पद्धती जनतेच्या लोकशाहीवरील विश्वासामुळेच टिकून आहे.
२) सीमापार दहशतवादामुळे भारतीय सार्वभौमत्वास धोका निर्माण झाला आहे.
३) दहशतवादामुळे देशाच्या विकासास खीळ बसली असून लोकशाहीस धोका निर्माण झाला आहे.
४) समाज प्रबोधन व शिक्षणाच्या माध्यमातून लोकशाहीचे संवर्धन करता येते व दहशतवादाबाबत जनतेस जागृत करता येईल.
५) भारतीयांसाठी लोकशाही ही शासनपद्धती नसून जीवनपद्धती आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. माहितीचा प्रमुख स्त्रोत दुय्यम साधने हा आहे. यात संदर्भग्रंथ, वैचारिक ग्रंथ, नियतकालिके व वर्तमानपत्रातील लेख यांचा आधार घेण्यात आला आहे व विषयाची मांडणी करण्यात आली आहे.

**भारतीय लोकशाहीचे स्वरुप :**

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात भारतीय स्वातंत्र्य सैनिकांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, कायद्याचे राज्य ही मूल्ये जोपासली होती. त्यामुळे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला व १९५० साली राज्यघटना अंमलात आली आणि १९५२ साली भारतात पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. भारतात संघराज्य शासनपद्धती व सांसदिय शासनपद्धतीचे मिलाफ दिसून येतो.

भारतात लोकशाही शासनपद्धती असली तरी ही इथे इंग्लंडप्रमाणे प्रग्लभ लोकशाही दिसून येत नाही. निवडणुकांमध्ये जाती धर्माचा व पैशांचा वापर काही प्रमाणात का होईना होतोच. भारतात राजकीय निरक्षरतेचे प्रमाण काहीसे असल्यामुळे योग्य उमेदवार निवडला जाईल याची शाश्वती नाही. अनेक वेळा मतांची खरेदी विक्री होते. तरी परंतु भारतीय लोकशाही गेल्या ७ दशकात अजुनही खंबीरपणे उभी आहे.

भारतात जसजसे साक्षरतेचे प्रमाण वाढेल जनतेचे राजकीय प्रबोधन होईल तसतसे हे प्रकार कमी होतील असा विश्वास आहे. इतर देशांच्या तुलनेत भारतात शांततेत निवडणुका पार पडतात. इतर विकसनशील व अप्रगत देशांमध्ये ज्या प्रमाणे वारंवार बंडाळ्या होतात, राज्यघटनेची मोडतोड होते तसे प्रकार भारतात घडत नाही. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर सर्वच प्रौढ नागरिकांना एकदाच मताधिकार देण्यात आला. यात स्त्री-पुरुष, शिक्षीत-अशिक्षीत, श्रीमंत-गरीब असा भेदभाव केला नाही.

भारतीय लोकशाही एखाद्या अभेद्य किल्ल्याप्रमाणे आहे. तिच्यावर अनेक आघात झाले तरी ती अद्याप टिकून आहे. भारतीय लोकशाही समोर जातीयता, भ्रष्टाचार, राजकीय गुन्हेगारी, प्रादेशिकवाद, नक्षलवाद व दहशतवाद अशी अनेक आव्हाने आहेत. त्यातील दहशतवाद हे प्रमुख आव्हान आहे. आज भारतावर अनेक दहशतवादी हल्ले झाले तरी भारतीय लोकशाहीत अद्याप तरी मोठा धोका निर्माण झालेला नाही. तरी परंतु या दहशतवादाकडे दुर्लक्ष करता कामा नये. दहशतवाद ही नेमकी काय समस्या आहे हे मुळातून समजून घेणे आवश्यक आहे. त्याचा योग्य पद्धतीने अभ्यास होणे गरजेचे आहे. असे झाले तरच या समस्येवर आपणास समाधान शोधता येईल.

**दहशतवादाचा अर्थ व भारतातील दहशतवादाचे स्वरुप :**

भारतातील दहशतवादाचे स्वरुप समजावून घेण्यापूर्वी दहशतवाद म्हणजे नेमके काय? हे समजून घेणे महत्वाचे ठरेल. गेली अनेक वर्षे दहशतवादावर चर्चा होत असली तरीही दशहतवादाची सर्वमान्य व्याख्या करणे कुणालाही जमले नाही.

दहशतवाद या शब्दास इंग्रजीमध्ये Terror असे म्हणतात. हा शब्द लॅटीन भाषेतील Deterre या शब्दापासून तयार झाला आहे. याचा अर्थ थरकाप किंवा घाबरविणे असा आहे. दहशतवादात प्रामुख्याने एकास मारा व दहा हजारांना घाबरवा हे तत्व अवलंबले जाते.

- सामाजिक शास्त्राच्या शब्दकोषानुसार दहशतवाद ही अशी पद्धत आहे की ज्या द्वारे एखादा संघटीत समुह किंवा पक्ष आपल्या प्रकट उद्देशांच्या प्राप्तीसाठी हिंसाचाराचा उपयोग करतो.
- आंतरराष्ट्रीय परिषदेने केलेल्या व्याखेनुसार "राज्याविरुद्ध केलेला अपराध किंवा विशिष्ट व्यक्ती समुहाच्या मनात हेतुपुरस्सर दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने केलेली योजनाबद्ध गुन्हेगारी कृती म्हणजे दहशतवाद होय.

आपल्या भारतास स्वातंत्र्यापासून दशहतवादाच्या समस्येस तोंड द्यावे लागत आहे. भारतास फाळणीच्या वेळेसच दहशतवादाचे चटके सोसावे लागले. काश्मीर भारतात सामील झाल्यापासुनच पाकीस्तानने इथे दहशतवादास सुरुवात केलेली दिसते. याशिवाय पंजाबमधील स्वतंत्र खलीस्तानच्या चळवळीस पण पाकीस्तानाने पाठींबा दिला. या दोन्ही चळवळींमुळे भारताच्या सार्वभौमत्वासच आव्हान दिले गेले. आज पंजाबमधील स्वतंत्र खलीस्तानची मागणी मागे पडली आहे व तिथे शांतता आहे. मात्र जम्मु काश्मीर आजही धगधगत आहे व तिथे रोजच दहशतवादी व लष्कर यांच्यात चकमकी होत आहेत. या इस्लामी दहशतवाद्यांच्या प्रशिक्षणाची संपूर्ण सोय पाकीस्तानमध्ये केली जात आहे व हे प्रशिक्षीत अतिरेकी भारतात घुसखोरी करुन अशांतता निर्माण करीत आहेत. मुंबईवरील २६/११ चा हल्ला भारतीय विमानाचे अफगाणीस्तानमध्ये अपहरण, लष्करी केंद्रावर वारंवार होणारे हल्ले हे सर्व पाकीस्तानचे प्रताप आहेत. स्वत:ला जगाचे पोलीस म्हणवून घेणारी अमेरिका पण याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करीत होती. पण ज्यावेळी त्यांच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला झाला. तेव्हा अमेरिकेस पण दहशतवाद काय असतो, याची जाणीव झाली व नंतर त्यांचे धोरण बदलले. या सीमापार दहशतवादाने पण भारतीय लोकशाहीस

आव्हान निर्माण केले आहे. याशिवाय भारतात नक्षलवादी चळवळीने पण देशांतर्गत दहशतवाद निर्माण केला आहे. पश्चिम बंगालमधील नक्षलबाडी या छोट्याशा गावातून सुरु झालेल्या या नक्षलवादाने पण भारताच्या अंतर्गत सुरक्षेस प्रचंड धोका निर्माण केला आहे. प्रामुख्याने डाव्या विचारसरणीवर विश्वास ठेवण्याऱ्या या चळवळीने आता व्यापक स्वरुप धारण केले आहे. यात माओवादी चळवळ जहाल आहे व त्यास चीनचा पाठींबा आहे हे लपून राहिले नाही साम्यवादाचे (मार्क्सवादाचे) अती जहाल स्वरुप म्हणजे नक्षलवाद होय. या नक्षलवादी चळवळीमुळे पण मानवी मूल्ये पायदळी तुडवली जात आहेत व यामुळे भारतीय लोकशाहीस धोका निर्माण झाला आहे. भारतात आज छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, तेलंगणा, ईशान्य भारताकडील राज्ये व महाराष्ट्राचा काही भाग नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जातो.

स्वातंत्र्यानंतर दक्षीणेकडील राज्यात पण स्वतंत्र द्रविडीस्तानची मागणी जोर धरत होती. महतप्रयासाने त्यांना राष्ट्रच्या मुख्य प्रवाहात सामील केल्यानंतरही श्रीलंकेमधील लिट्टे चळवळीचा त्रास भारताला सहन करावाच लागला. या लिट्टे गनीमांच्या बंदोबस्तासाठी भारतास श्रीलंकेत शांती सेना पाठवावी लागली व याचाच परिणाम पुढे राजीव गांधी यांच्या हत्येत झाला.

याशिवाय ईशान्य भारतात पण उल्फा अतिरेकी, बोडो चळवळ यांच्या माध्यमातून आजही दहशतवाद अस्तीत्वात आहे. भारतातील दहशतवादास धर्मवादाची किनार आहे. अनेक विश्लेषक हिरवा दहशतवाद, भगवा दहशतवाद असे प्रकार करतात. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, भारतात उपद्रव निर्माण करणाऱ्या सर्वच दहशतदवादी संघटना या एकाच धर्माच्या नाही. काही नमुने पाहू.

- युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (उल्फा) व श्रीलंकेत निर्माण झालेली लिट्टे (तामीळ) यात प्रामुख्याने हिंदू आहेत.
- ईशान्य भारतातील नागालँड सोशलीस्ट कॉन्सील या दहशतवादी संघटनेत प्रामुख्याने ख्रिश्चन आहेत.
- पंजाबमधील खलीस्तानवादी कमांडो फोर्स, बब्र खालसा या दहशतवादी संघटनेत प्रामुख्याने शीख आहेत.
- जम्मु कश्मीर मधील लष्कर-ए-तोयबा, हिजबुल मुजाहीदीन व हरकत-उल-अन्सार या दहशतवादी संघटनांमध्ये प्रामुख्याने मुस्लीम आहेत.

वरिल विवेचन पाहता असे दिसते की, भारतातील सर्वच दहशतवादी हे मुस्लीम नव्हेत किंवा हिंदू नव्हेत. मुळात या दहशतवाद्यांना धर्मच नसतो. कारण कोणताही धर्म हा निष्पाप नागरिकांचे जीव घ्या असे सांगत नाही. उलट दहशतवादी हे स्वतःच्या स्वार्थासाठी धर्माचा आसरा घेत आहेत व धर्माला बदनाम करीत आहेत.

**भारतातील काही प्रमुख दहशतवादी कृत्ये :**

स्वातंत्र्यप्राप्ती पासून आजपर्यंत भारतात झालेला काही प्रमुख दहशतवादी कृत्ये पुढीलप्रमाणे-

१) ३१ ऑक्टोबर १९८४ साली शीख दहशतवाद्यांनी भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदीरा गांधी यांची हत्या केली.

२) २३ जून १९८५ साली शीख अतिरेक्यांनी भारताचे कनिष्क हे विमान बॉम्बद्वारे उडवीले.

३) १९९१ साली लिट्टे बंडखोरांच्या आत्मघातकी पथकाने तामीळनाडूत राजीव गांधी यांची हत्या केली.

४) १२ मार्च १९९३ साली दहशतवाद्यांनी अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहीम यांच्या मदतीने मुंबईत बॉम्बस्फोट घडवीले.

५) २५ डिसेंबर १९९९ साली इंडियन एअर लाईनच्या विमानाचे काठमांडू येथून अपहरण करण्यात आले.

६) १३ डिसेंबर २००० साली भारताच्या संसदेवर हल्ला करण्यात आला.

७) २६/११ रोजी मुंबईत ताज हॉटेल व इतर ठिकाणी दहशतवादी हल्ले करण्यात आले.

८) अलीकडेच उरी येथे लष्कराच्या छावणीवर हल्ला करण्यात आला.

ही यादी फार मोठी आहे. आपण फक्त प्रमुख दहशतवादी कारवायांचाच आढावा घेतला आहे.

**दहशतवादाचे निर्मुलन व लोकशाही संवर्धनासाठी उपाय :**

या दहशतवादामुळे भारतीय लोकशाहीस धोका आहे हे स्पष्ट आहे. भारतात लोकशाही शासनपद्धती टिकवून ठेवण्यासाठी व दहशतवादाच्या बंदोबस्तासाठी आपणास पुढील उपाययोजना करता येतील.

१) भारतात निरक्षरता व बेकारीचे प्रमाण जास्त असल्याने बेकार युवक सहज दहशतवादाकडे आकर्षीत होतात यासाठी रोजगाराभिमुख व अधुनिक दृष्टिकोन अंगीकारणारे शिक्षण द्यावे यामुळे लोकशाही बळकट होण्यास मदत होईल.

२) भारतातील वंचित मागास समाज घटकांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात व सत्तेत सामील करुन घेतले पाहिजे.

३) भारतात ज्या नक्षलवादी कारवाया होत आहेत व आदिवासींची जी आंदोलने होत आहेत त्याकडे सरकारने दुर्लक्ष करता कामा नये.

४) भारतातील प्रसार माध्यमे ही स्वतंत्र व निष्पक्ष असावीत ती एकांगी स्वरुपाच्या बातम्या देणारी नसावीत.

५) भारतातील राजकीय पक्षांनी आता जागृत झाले पाहिजे व पक्षीय दृष्टिकोन सोडून राष्ट्रहिताच्या विचार करावा आणि लोकशाही मजबुत करावी.

६) निवडणूका ह्या निष्पक्ष वातावरणात पार पडल्या पाहिजेत. मतदान यंत्राविषयी जनतेच्या मनात जी शंका आहे ती दूर केली पाहिजे. तरच लोकशाही टिकेल.

७) भारतातील धार्मिक तेढ कमी करुन सर्वच जाती धर्माच्या लोकांनी गुण्यागोविंदाने राहिल्यास दहशतवादाचा धोकाम कमी होईल व लोकशाही संवर्धनासाठी मदत होईल.

८) मादक पदार्थ व शस्त्रांचा तस्करीस आळा घातला पाहिजे कारण मादक पदार्थांच्या विक्रीतून जो पैसा येतो त्याचा वापर शस्त्र खरेदीसाठी होतो.

९) शरण आलेले दहशतवादी व नक्षलवादी तरुणांच्या पुनर्वसनासाठी ठोस उपाय योजना करुन त्यांना पण राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात सामील करुन घ्यावे.

१०) लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी म. गांधी यांची स्वयंपूर्ण व स्वयंशासीत खेडी ही संकल्पना राबवावी व त्यांच्या सत्य व अहिंसा या तत्वाचा अधिक प्रसार करावा.

**सारांश व निष्कर्ष :**

वरील विवेचन पाहता असे दिसते की, स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. भारतास लोकशाहीची परंपरा नसली तरीही केवळ भारतीय जनतेमुळे ही लोकशाही पद्धती आजही टिकून आहे. भारत व पाकीस्तान हे दोन्ही देश एकाच वेळी स्वतंत्र झाले असले तरीही पाकीस्तानात अजुनही लोकशाही रुजू शकली नाही. मात्र भारतात लोकशाही शासन पद्धतीने चांगलेच मूळ धरले आहे. या लोकशाही शासन पद्धतीसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यापैकी दहशतवाद हे प्रमुख आव्हान आहे. या दहशतवादामुळेच देशाच्या प्रगतीस खीळ बसली आहे. अन्यथा भारत हा कधीच महासत्ता बनला असता. विशेषत: आज सीमापार पाक

पुरस्कृत दहशतवादामुळे लोकशाहीच्या मार्गात अडथळे निर्माण होत आहेत. शिक्षणाचा प्रसार करुन व समाजप्रबोधन करुन जनतेत जागृती निर्माण केली तर दहशतवादास आळा घालता येवू शकेल.

भारतीय लोकशाही अभेद्य आहे. राज्यघटनेच्या निर्मितीनंतर भारतीय लोकशाहीने यशस्वी वाटचाल केली आहे. गेल्या सात दशकात भारतीय लोकशाही समोर अनेक संकटे निर्माण झाली. मात्र त्यातून भारतीय लोकशाही ही तावून सुलाखुन बाहेर पडली आहे. आज अनेक देशात लोकशाही शासन पद्धती डळमळीत होत असताना भारतीय लोकशही यशाच्या शिखराकडे वाटचाल करीत आहे. दहशतवाद हा भारतीय लोकशाहीचा शत्रु आहे. या दहशतवादाने भारताचे फार मोठे नुकसान केले आहे. म्हणून त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे.
भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी २०२० साली भारताला महासत्ता बनविण्याचे स्वप्न पाहिले होत. हे स्वप्न साकार करण्यासाठी भारतातील दहशतवाद वेळीच रोखणे आवश्यक आहे असे वाटते.

**संदर्भ सूची :**


१) राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर (संपा); "भारतीय लोकशाही तत्व आणि व्यवहार", डायमंड पब्लीकशेन, पुणे.
२) स.मा. गर्गे (संपा) : भारतीय समाज विज्ञान कोष, खंड ३, पुणे १९८९
३) कुबेर गिरीश : "धर्म-युद्ध", राजहंस प्रकाशन, पुणे २००९
४) फडके य.दी. : "राजकीय दहशतवाद", अक्षर प्रकाशन मुंबई २०००.
५) शिंदे ज.रा., अमृतकर प्रशांत: "समकालीन जागतिक राजकारणातील प्रमुख समस्या", चिन्मय प्रकाशन औरंगाबाद. २००५.
६) कुलकर्णी सुधाकर : "राजकीय सिद्धांत", अरुणा प्रकाशन, लातूर २०१०
७) इंडीया टुडे
८) दै. लोकमत व दै. लोकसत्ता लेख.

ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year -VIII, Issue - XIX, Vol.- I | Impact Factor 5.85 (GRIFI) | Jan. 2019 To June 2019

JANVIKAS MAHAVIDYALAYA, BANSAROLA AND
DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHAWADA UNIVERSITY,
AURANGABAD
Sponsored
NATIONAL LEVEL CONFERENCE
ON
## "POLITICS OF DEVELOPMENT IN INDIA"




**Editor in Chief**
**Dr. Babasaheb M. Gore**

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakheo Dist.Parbhani

RNI. MAHMUL02805/2010/32461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 5.85
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. I, Jan. 2019 To June 2019

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Women's Rights in India : Position of Women<br>**Dr. Rajpal Bhullar** | 1 |
| 2 | Rural Politics and Human Rights of Women's<br>Dr. Vilas Bharat Bansode | 7 |
| 3 | Women Entrepreneurship Development in India<br>**Shital Narsing Puri** | 12 |
| 4 | Rural E-Services Delivery<br>Enabling Panchayat through Aaple Sarkar Seva Kendra<br>(rural development in India)<br>**Dr. Urmila Govindrao Reddy** | 15 |
| 5 | भारतीय राजनीती में दलित महिला राजनितिज्ञों के बढते कदम<br>**सुकेशनी आसाराम थोरात** | 23 |
| 6 | जागतिकीकरणाचा राष्ट्रीय राज्याच्या विकासावर झालेला परिणाम एक अभ्यास<br>**डॉ. विठ्ठल शंकरराव देशमुख** | 29 |
| 7 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर.: भारतीय लोकशाहीच्या घटनात्मक विकासातील योगदान<br>**डॉ. आर. बी. शेजुळ** | 33 |
| 8 | राष्ट्र विकासात स्वयंसेवी संस्थांची भूमिका<br>सुभाष पोले | 38 |
| 9 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर - यांचे सामाजिक विचार आणि विकास<br>तांदळे सुरेंद्र सुंदरराव | 43 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संसदीय लोकशाही<br>डॉ. रेखा रामनाथ वने | 47 |
| 11 | भारतीय स्त्रीयांचे धर्मातील स्थान<br>**बळीराम पवार** | 51 |



Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संसदीय लोकशाही

डॉ. रेखा रामनाथ बने
राज्यशास्त्र विभाग,
कै. सौ. शेषाबाई मुंढे महाविद्यालय,
गंगाखेड, जि. परभणी

10 Research Paper - Political Science

भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेबांचे योगदान मोलाचे आहे. भारतीय विकासाचा मुलाधार असलेल्या राज्यघटनेच्या निर्मीतीमध्ये आबेंडकराचा वाटा मोठा आहे. त्यांनी मांडलेल्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विचारांना जसे महत्व प्राप्त झाल आहे. त्याचप्रमाणे त्यांनी मांडलेल्या लोकशाही आणि राजकीय व्यवस्थेलाही महत्व प्राप्त झाले.

त्यांनी अर्थशास्त्र, राजकारण, इतिहास, तत्त्वज्ञान इत्यादी विषयावर लिखाण केले. मात्र त्यांचे सामाजिक आणि राजकीय घडामोडीतील लिखाण विशेष आहे. डॉ. आबेंडकराची संसदीय लोकशाहीची संकल्पना ही भारतीय राजकीय विचाराला दिलेली एक वैशिष्टयपूर्ण देणगी आहे. त्यांचा लोकशाहीचा विचार समाज जीवनाच्या वास्तवतेच्या समग्र संदर्भात मांडतात. आर्थिक आणि सामाजिक वास्तवाच्या संदर्भात राजकीय लोकशाहीच्या विचाराची आणि कार्य पध्दतीची चिकित्सा केली पाहिजे अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या मते लोकशाही हा समाजाच्या समग परिवर्तनाचा विचार आहे. केवळ राजकीय लोकशाहीने समाजाचे आमुलाग्र परिवर्त नहोणार नाही तर त्यासाठी सामाजिक आर्थिक लोकशाहीची जोड दिली तर राजकीय लोकशाही टिकणार आहे. त्यासाठी संसदीय लोकशाहीचा स्विकार करून सामाजिक आर्थिक दृष्टया, शोषित, दलित आणि सत्ता वंचित असलेल्या वर्गाला, समुहाला सत्ता प्राप्तीची व्यापक संधी व समान सामर्थ्य देण्याचा विशेष प्रयत्न त्यांनी केला.

विविध जाती, धर्म, वंश, लिंग आदि बाबतीत भेदाभेद वृत्ती, भारतात विविध जातीच्यात

असलेली उतरंड, अनेक स्तरावर असलेली विषमता, अनेक धर्म, पंथ, परंपरा, भाषा संस्कृती इत्यादीनी नटलेल्या या देशात स्वातंत्र्य, समता, बंधुता यावर आधारलेली शासन व्यवस्था समाजात खोलवर रूजली पाहिजे या उद्देशानेडॉ. बाबासाहेबांनी संसदीय लोकशाहीचा स्विकार कसा करावा लागेल, तिचे स्वरूप कसे असेल हे त्यांनी आपल्या विचारातून मांडले. तेव्हा प्रस्तुत शोधलेखात त्यांच्या संसदीय लोकशाहीचा भारतीय जडणघडणीत अभ्यास करण्यात आला आहे.

उद्दिष्टे :–

1. डॉ. आंबेडकर यांनी मांडलेल्या संसदीय लोकशाहीबाबातचे विचार अभ्यासणे.
2. भारताच्या जडणघडणीत संसदीय लोकशाहीचे महत्व जाणून घेणे.

गृहितकृत्ये :–

1. भारताच्या जडणघडणीत संसदीय लोकशाहीचा मोठा वाटा आहे
2. भारत एकसंधता टिकवून ठेवण्यात डॉ. आंबेडकराचे विचार

डॉ. आंबेडकराचा संसदीय लोकशाही हा विचार केवळ आदर्शाच्या स्वप्नरंजनातून उपजलेला नव्हता तर तो भोवतालच्या सामाजिक, राजकीय वास्तवात तावून सुलाखून निघाला होता. त्यांच्या मते राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत परीवर्तन झाले पाहिजे. संसदीय लोकशाही म्हणजे समता, स्वांतत्र्य व विश्व बंधूत्व यावर आधारीत उभी करणे आवश्यक आहे. मात्र राजकीय लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर सामाजिक आणि आर्थिक पातळीवर ही सर्वांना समता आणि स्वांतत्र्य हवे. त्यांच्या मते सामाजिक आणि आर्थिक लोकशाही हेराजकीय लोकशाहीच्या पेशी आणि तंतू सारखे आहेत. परंतू जाती व्यवस्थेमूळे एक तर सामाजिक आणि आर्थिक लोकशाही नाकारली जाते. जाती व्यवस्थेचे निमूर्लन करून मानवीसमता व स्वातंत्र्य संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेत अनुसरता येते. या उद्देशाने आंबेडकरानी संसदीय लोकशाही व्यवस्थेचा स्विकार भारतासाठी केला.

संसदीय लोकशाहीमध्ये व्यक्तीच्या अंगी जबाबदारीची जाणीव येते. शासन पध्दतीमध्ये सहकार्यावर भर असतो. येथे व्यक्तीला महत्वाचे स्थान मिळत असते. क्रांती न घडता तेथे सामाजिक व आर्थिक क्षेत्रात बदल घडू शकतात. संसदीय लोकशाहीत माणसाच्या स्वातंत्र्याचा त्याच्या जगण्याचा आणि त्या माणसाचा प्रतिष्ठा याला महत्वाचे स्थान असते. या शासन व्यवस्थेतच सामाजिक लोकशाही म्हणजे प्रत्येकाला दुसऱ्याबद्दल प्रेम, आदर वाटला पाहिजे. तसेच लोकांना समान अधिकार असले पाहिजेत. जातिव्यवस्थेचे निमूर्लन करण्यात या व्यवस्थेचा

स्विकार हा महत्वाचा ठरतो.

संसदीय लोकशाही यशस्वितेसाठी प्रबळ विरोधी पक्षाच्या स्वीकार केला जातो. त्यामूळे सत्ताधारी पक्षाच्या बेलगाम सत्ता वापरावर नियंत्रण पडते. संसदीय लोकशाहीत किमान दोन पक्ष असले पाहिजेत. त्यामूळे जनतेच्या व्यक्ति स्वांतत्र्य व मुलभूत हक्काचे संरक्षण होण्यास एक मजबूत आधार मिळतो. आंबेडकरानी तीन गोष्टींना अतिशय महत्व दिले आहे. सामाजिक विषमता कदापिही समर्थनीय नसते. मनुष्य निसर्गतः विषम असतो. म्हणून त्याला समानतेची वागणूक देणे आवश्यक असते. त्यातूनच न्याय साधला जातो. मुख्यतः तीन गोष्टी साधल्या गेल्या तरच लोकशाही यशस्वी होऊ शकते.

राजकीय लोकशाही बळकट करण्यासाठी डॉ. आंबेडकरानी सामाजिक आर्थिक लोकशाहीवर जसा भर होता त्याच प्रमाणे अहिंसक मार्गाचा वापर ही त्यांनी पुर्वअट मानली होती. कोणत्याही रक्तपाताविना विधायक मार्गाने क्रांतीकारक बदल घडवून आणणारी शासनपध्दती म्हणजे लोकशाही असे त्यांचे मत होते. भारतात उपेक्षित, वंचित वर्गाना त्याचे अधिकारमिळवून देण्याच्या उद्देशाने या संसदीय लोकशाहीचे स्वरूप आंबेडकरानी तयार केले. जसे जातीव्यवस्थेचे निमूर्लन केले. तसे समाजाची 50 टक्के लोकसंख्या असलेल्या महिला वर्गाच्या हिताचा (अधिकाराचा) विचार त्यांनी समान अधिकार व भेदभाव विना व्यक्ति स्वातंत्र्यातूनच तर केलाच त्याच बरोबर हिंदूकोड बिलाचा स्विकार करून त्यांना आर्थिक अधिकार मिळवून दिला. त्यांच्या मते आर्थिक लोकशाही निर्माण केल्या शिवाय संसदीय लोकशाही यशस्वी होणार नाही. त्यांच्या समाजवादी विचाराचा उगम ही दारिद्रया विषयी वाटणाऱ्या कळकळीतूनच झाला आहे. त्यांचा समाजवाद हा व्यक्ति प्रतिष्ठेला पुरक आहे. व्यक्ति लाभे डसावणाऱ्या भूक, बेकारी, टंचाई इत्यादी सामाजिक समस्या सोडविण्यात यशस्वी झाला.

भारतात संसदीय लोकशाहीची उभारणी करणे एवढया पुरतेचत्यांचेराजकीय ध्येय परिमित नव्हते. तर जगात जिथेजिथे लोकशाही असेलत्या सर्वच राष्ट्रांशी सहकार्य करून भारतानं लोकशाही मुल्यांचे सरंक्षण करावे हा व्यापक उद्देश होता. आज जगात भारताची वेगळी प्रतिमा निर्माण होण्यास या व्यवस्थेच्या शांततामय सह अस्तित्व व व्यक्ति स्वातंत्र्य या तत्त्वाची प्रमुख भुमिका आहे.

एकंदरीत डॉ. आंबेडकरानी संसदीय लोकशाही व्यवस्थेचा स्विकार करून भारतातील विविधतेला एक संघतेत गुंफण्यात यश मिळविले. समाजातील प्रत्येक माणसाला महत्वाचे स्थान, समान अधिकार व स्वातंत्र्य मिळवून देण्यात या व्यवस्थेचे यश मोठे आहे. उपेक्षित, वंचित व

दुर्लक्षित असलेल्या समाजातील वर्गाला त्यांचे अधिकार देऊन समता प्रस्थापित केली. जगात भारताची शांततामय सहजीवनाचा पुरस्कार करणारे राष्ट्र म्हणून ओळख करून देण्यात संसदीय शासन व्यवस्थेची प्रमुख भुमिका आहे.

## संदर्भ सूची :-

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर– धनंजय किर
2. लोकराज्य -- एप्रिल 2017
3. आधुनिक भारतातील राजकीय वारसा– य.च.मु.वि. नाशिक
4. दै. लोकसत्ता–दि. 14 एप्रिल 2017

## ज्योतीचंद्र पब्लिकेशन, लातूर.

**ISBN नंबर नुसार पुस्तक प्रकाशनाची सुवर्ण संधी**

वैशिष्ट्ये :-

१) विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व इतर लेखकांचे पुस्तक 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर ISBN नंबर नुसार प्रकाशित करणे.

२) संशोधक, प्राध्यापक यांच्या M.Phil, Ph.D. संशोधनात्मक पुस्तकांना विशेष प्राधान्य.

३) यु.जी.सी. च्या नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार उच्च शिक्षणामध्ये कार्यरत संशोधनार्थी व प्राध्यापक यांना आपले पुस्तक ISBN नुसारच प्रकाशित करणे आवश्यक आहे. तरी, संशोधनार्थी व प्राध्यापक यांनी आपले मौलिक साहित्य ISBN नुसार प्रकाशित करून घ्यावे, ही विनंती.

- संपर्कासाठी पत्ता -

प्रकाशक,
ज्योतीचंद्र पब्लिकेशन
"ग्यानदेव-पार्वती", R-9/139/6, विशाल शाळेजवळ,
एल.आय.सी. कॉलनी, प्रगती नगर, लातूर.
ता. जि. लातूर - 413531.(महाराष्ट्र),भारत
ऑफिस फोन नं. - 02382 - 241913
मो. नं.9423346913, 9503814000, 9637935252, 7276301000

ISSN No-2278-5655

NAAC Re- accredited with Grade B

Government of Maharashtra

# Shree Maharani Tarabai Government College of Education, Kolhapur, (Maharashtra)- 416001

One Day Interdisciplinary International Conference

On

# SKILL DEVELOPMENT IN HIGHER EDUCATION



2nd February, 2019

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

Tel No. 0231-2535043 WWW.smtckop.edu.in Email: princ.smtbedko-mhgov.in

| Sr. No. | Title Name | Author Name | Page No |
|---|---|---|---|
| 44 | Role of IQAC in Maintaining Quality Standards in Higher Education | Sunayana Jotiram Jadhav | 174 |
| 45 | Role of Mass Media in Developing Soft Skills and Body Language among Degree Students of Rural Area: A Survey Study in ELT | TukaramR.Hapgunde & Dr.D.N.More | 178 |
| 46 | उच्च शिक्षणातील समस्या: एक आकलन | प्रा.डॉ.उमेश शेकडे | 182 |
| 47 | Theimportance Of Soft Skills In Higher Education | Vijaymala V. Chougule | 185 |
| 48 | Co-relation between Skill Development and Inclusive Education' | Kamalakar Baburao Gaikwad & Dr. Sandip Prabhakar Khedkar | 189 |
| 49 | Role Of ICT In Legal Education | Dr Chandrani Shashikant Bagadi | 193 |
| 50 | The Role & Impact Of ICT In Improving The Quality Of Education | Prashant G.Kumdale | 196 |
| 51 | Skill Development As A Challenge In Higher Education In 21st Century | Dr. JadhavBhikaLala | 198 |
| 52 | Skill Development in 21st Century | Jagdish Ganpati Kumbhar | 202 |
| 53 | ICT For Teacher Education Programme | Dr. Sharad B. Ingawale | 205 |
| 54 | Challenges And Opportunities For Skill Development In Higher Education | Dr Manjunath Bhat | 208 |
| 55 | Role of Skill Development in Higher Education | Dr. M.S. Patil & Dr. H. Y. Kamble | 210 |
| 56 | Leadership Skills for Librarians | Mrs.SandhyaGirishYadav | 214 |
| 57 | Skill Development in 21st Century | Dr.Nafisa Roopawalla | 218 |
| 58 | Women's Empowerment Through Skill Development | Dr. Smt. Desai M.B. | 222 |
| 59 | कौशल्य विकास शिक्षणाची गरज | प्रा. डॉ. रेखा रामनाथ बने | 226 |
| 60 | Development and Assessment of Teaching Skills in Teacher Education: A Case Study | Ganesh Chandra Naik & Jojen Mathew | 228 |
| 61 | A Study On The Role Of Higher Education In National Integration | Smt. Raziyabegum F Sheikh Jayaramaiah | 232 |
| 62 | Communication Skills Development in TEP. | Dr. Sarjerao Pandurang Chavan | 236 |
| 63 | Development of Life Skill in Higher Education- A Life Beyond the Classroom | Sangeeta Rajaram Kadam | 239 |
| 64 | Essential Soft Skills To Be Instilled In B. Ed Trainees (Apart From Teaching Skills) | Dr. Sushma A. Narasgouda | 243 |


Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

# कौशल्य विकास शिक्षणाची गरज

प्रा. डॉ. रेखा रामनाथ वने
राज्यशास्त्र विभाग, कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंडे कला महाविद्यालय, गंगाखेड

व्यक्तिच्या सर्वांगीण विकासाचे सर्वात महत्वाचे साधन हे शिक्षण आहे. शिक्षणामुळेच व्यक्तिचा शारीरिक, बौध्दीक आणि आत्मीक विकास होतो. व्यक्तिला नोकरी व रोजगार उपलब्ध करुन देण्याचे ते एक माध्यम आहे. भावी पिढ्यांच्या सशक्त समृध्द जिवनाचा तो महामंत्र व राष्ट्रविकासाचा आत्मा आहे. मात्र त्यासाठी राष्ट्रउभारणीस कारक ठरणाऱ्या जबाबदार नागरीकांची निर्मीती ज्या शिक्षणव्यवस्थेत साध्य ठरेल अशा व्यवस्थेची उभारणी त्या देशाने करणे आवश्यक आहे. ज्या देशामध्ये ज्ञान आणि कौशल्याला उच्चतम महत्व दिले जाते. तोच देश सांस्कृतिक व सामाजीक प्रगती करत असतो.

कोणत्याही देशाच्या आर्थिक प्रगती व सामाजीक विकासाचे कौशल्य आणि ज्ञान हे प्रेरिशक्ण शक्ती आहेत. उच्च आणि चांगल्या स्तरावरील कौशल्य असलेले देशकामाच्या आव्हानांना आणि जगाच्या संधीना अधिक प्रभावीपणे समायोजीत करतात. कोणत्याही देशामध्ये कौशल्य विकास कार्यासाठी मुख्यत: युवा पिढीवर लक्ष केंद्रीत केले जाते. या संदर्भात भारताची स्थिती चांगली आहे. भारताकडे एकूण लोकसंख्येच्या ६०५ दशलक्ष लोक २५ वर्षापेक्षा लहान आहेत. रोजगारासाठी उपयुक्त कौशल्य प्राप्त करुन युवा पिढी परीवर्तनाचे प्रतिनिधीत्व करु शकतात. त्यासाठी युवा पिढी निरोगी, सुशिक्षीत व कुशल होईल तेव्हाच त्यांचा लाभ आपल्या अर्थव्यवस्थेला होवू शकतो.

आजच्या शिक्षणव्यवस्थेबद्दल विद्यार्थी आणि पालक वर्ग संभ्रमावस्थेत जात आहे. कारण सध्याच्या शिक्षणवयवस्थेत प्रशिक्षीत तरुणांना नोकरी करता येण्याजोगे कौशल्य मिळत नाही. उच्च शिक्षण घेतल्यानंतर नोकरीची हमी मिळेल काअसा प्रश्न विद्यार्थी आणि पालकांना पडत आहे. असा प्रश्न पडण्याचे कारण सामाजीक वास्तवेत दडले आहे. शिक्षण आणि नोकरी असे समीकरण आपल्याकडे तयार झाले आहे. शिक्षण हे अर्थार्जनासाठीच करायचे असते अशी समजूत होत चालली आहे आणि ते गैर ही नाही. खऱ्या अर्थाने शिक्षणाचा संबध हा रोजगारासाठी आहे. मात्र आपल्याकडील शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानावर भर देणारे असल्यामूळे शिक्षण आणि कौशल्य यांची फारकत शालेय स्तरापासून होते. त्यामूळे शिक्षण घेतल्यानंतर व्यक्तिच्या जीवनउभारणीची निश्चित दिशा मिळत नाही. अलीकडे याची जाणीव सर्वांना होत असल्यामूळे कौशल्याधारीत शिक्षण व्यवस्थेकडे कल निर्माण होत आहे. कोठारी आयोगापासून राष्ट्रीय ज्ञान आयोगापर्यंत अनेक आयोगांनी व्यावसायीक शिक्षणांची गरज नमुद केली आहे. त्याआधारे कौशल्य आधारीत शिक्षणावर भर देण्यात आला आहे. राष्ट्रपती प्रणव मुखर्जींनी संसदेतील भाषणात **हर हाथ को हुनर**असे म्हणत नॅशनल मल्टी स्किल मिशन राबवणार असल्याचे सांगीतले.इयत्ता ६ वी वर्गापासून कौशल्य विकास अभ्यासक्रमाची ओळख करुन द्यावी. त्याचप्रमाणे बारावी उत्तीर्ण होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना कामाचा अनुभव मिळावा यासाठी खरी कमाईसारखी योजना सुरु करण्यात यावी अशी शिफारस राज्याच्या शिक्षण विभागाने शैक्षणीक आराखड्याच्या अहवालात केली आहे. प्रत्येक माध्यमिक शाळेत करीयर लॅब तयार करण्याची संकल्पनाही या आराखड्यात मांडण्यात आली आहे.

कौशल्य शिक्षणावर भर देवून कुशल मनुष्यबळ विकसीत करण्याची चर्चा मनमोहनसिंग सरकारच्या काळापासून ते सध्या सत्तेत असलेल्या मोदी सरकारच्या काळातही सुरु आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी याना आपले पद स्विकारल्यानंतर मंत्रीमंडळ तयार केले आणि त्यात कौशल्य विकास आणि उद्योजकता हे नविन खाते तयार केले. भारतात स्वांतत्र्यानंतर प्रथमच असे खाते तयार करण्यात आले. पंतप्रधान मोदीना त्याचे महत्व पटले होते. यापूर्वी माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी १९९१ साली **व्हिजन २०२०** हा ग्रंथ लिहिला होता. त्यामध्ये ही कौशल्य विकासाच्या कल्पनेचा खुप जवळचा संबंध होता. आज प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (पीएमकेव्हीवाय) ही युवकांच्या कौशल्य प्रशिक्षणासाठी एक मुख योजना आहे. या योजनेअंतर्गत अभ्यासक्रमात सुधारणा, योग्य शिक्षण आणि प्रशिक्षण शिक्षकावर अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शिक्षण आराखड्यासाठी राज्याकडून तयार करण्यात आलेल्या अहवालात कौशल्य विकासाला प्राधान्य देण्यात आले आहे. राज्याचा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभाग उच्च व तंत्र शिक्षण विभागाऐवजी आता कौशल्य विकास विभागाच्या नियंत्रणाखाली आणण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी घेतला. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील सर्व मंजूर पदे अधिकारी, कर्मचारी, अर्थसंकल्पीय तरतूद व तसेच आस्थापना विभागातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाची सर्व कार्यासने, पदे, अधिकरी, कर्मचारी आदी तरतुदी आता नवनिर्मित कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या अधिपत्याखाली येणार आहेत.

पुर्वी कला शाखेत कौशल्याधारीत शिक्षणाचा फारसा समावेश नव्हता. मात्र अलिकडे पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणातही कौशल्य विकासावर आधारीत अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात येत आहे. पुणे विद्यापीठानंतर स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड नेही कौशल्याधारीत शिक्षणावर आधारीत अभ्यासक्रम रचविण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी विद्यार्थी आणि शिक्षक वर्गाकडूनही चांगली साथ मिळाली पाहीजे. कारण आतापर्यंत आम्ही पारंपारीक पदवी अभ्यासक्रम किंवा थेट इंजिनीयरींग, मेडीकल यामध्येच बहुतांश रस आणि विश्वास सर्वांचा राहीलेला आहे. तेव्हा कलाशाखेतील या कौशल्याधारीत शिक्षणाला चांगला प्रतिसाद मिळाला तर निश्चितच रोजगार उपलब्धी व करीयर निश्चिती मिळण्यास त्याची मदत होवू शकते.

संदर्भ :–


१. भारत २०१७

२. लोकराज्य फेब्रुवारी २०१८

३. Loksatta.com, 12/01/2019

4. Maharashtratimes.com

Phule Samaj Sudharak Samiti's

SHAHIR ANNABHAU SATHE MAHAVIDYALAYA,
MUKHED, DIST. NANDED (M.S.)

Jointly Organized with
S.R.T.M. University, Nanded.

## One Day National Level Symposia in Multi - Disciplinary Studies

# Emerging Trends in Arts, Basic Science and Sports in India


**Chief - Editor**
**Principal Dr. Manohar Totare**

**Editor**
**Dr. Kalepwar Y.D.**
**Dr. Andhare A.V.**



Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

ISBN 978-93-5240-103-1

15. सामाजिक स्वास्थ्यासाठी प्राणायाम

प्रा. हुंबे बी. बी. .......... 76

16. A STUDY OF STRESS MANAGEMENT THROUGH YOGA

**Dr. Gopal Moghe, Dr. Baskar w. Mane** .......... 80

17. खेळातील महिला खेळाडुंचा सहभाग

**प्रा. डॉ. माधव शेजूळ, प्रा. वाकणकर गोविंद** .......... 84

18. The Influence of Aerobic Exercise Program on Blood Lipids Profile in Obese Lady Teachers

**S. R. Mane, N. B. Gajmal** .......... 87

19. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ग्रंथालयाने करावयाच्या उपाय योजना

**प्रा. मुंढे एस.डी., शिंदे एस.बी.** .......... 92

20. Yoga and Stress Management

**Asst. Prof. Nagesh Phulari** .......... 97

21. खेळाडू औषधी सेवन : परिणाम आणि उपाय योजना

**प्रा.डॉ.रमेश बापूराव कदम** .......... 101

22. THE EFFECT OF PHYSICAL ACTIVITY ON AUTONOMY NEED SATISFACTION OF PERSON WITH HEARING IMPAIRMENTS

**Ajith Gopi, Dr. Gopal. L. Moghe.** .......... 104

23. DEVELOPING LIFE SKILLS THROUGH SPORTS" SPORTS FOR THE GOOD- A PROJECT REVIEW

**Mr. Sam Joseph Braganza, Dr. R. V. Patil** .......... 107

24. Social development of wrestlers of Marathwada region: A study

**Dr. Vithal Singh R. P., Dr. Juzar Singh N. S.** .......... 109

25. THE STUDY OF EFFECT OF YOGA PRACTICE ON RESPIRATORY PARAMETERS AMONG WORKING WOMEN

**Dr.Baliram D.Lad** .......... 112

26. आजच्या शैक्षणीक ग्रंथालयातील सुरक्षीतता

**प्रा. सुधील आर. आंबटवाड, प्रा. राजेश ब. गोरे** .......... 116

Principal
Late.Sow.Sheshabai
Sitaram Mundhe Art's College
Gangakhed Dist.Parbhani

ISBN 978-93-5240-103-1

१९.

# शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ग्रंथालयाने करावयाच्या उपाय योजना

**प्रा. मुंढे एस.डी.**
विभाग प्रमुख
ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय
जळकोट जि.लातूर

**शिंदे एस.बी.**
ग्रंथपाल
कै.सौ.शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय
गंगाखेड जि.परभणी.

**प्रस्तावना :-**

२१ व्या शतकामध्ये ज्ञानाला भांडवलाचे स्वरुप आलेले आहे. सध्याचे यूग हे माहितीच्या परिस्फोटाचे यूग आहे. आधूनिक तंत्रज्ञानामूळे सर्वच क्षेत्रात प्रगती होत असलेली दिसून येते. काल निर्माण झालेली माहिती किंवा संशोधन आज जूने होत आहे किंवा त्यात नविन माहिती किंवा संशोधनाची भर पडत आहे. काही वर्षापूर्वी पुस्तके प्रकाशीत होण्याचे प्रमाण पण कमी होते. त्यामानाने सध्या पुस्तकाची संख्या पण लक्षणीयरीत्या वाढत आहे. आज माहिती तंत्रज्ञानामूळे जग खूप लहान झाले आहे. इंटरनेटच्या वापरामूळे तर आकाशाला गवसणी घालण्यासारखे सर्व काही मानवाच्या मुठीत आले आहे. शैक्षणिक क्षेत्रात पण विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर चालू झाला आहे. अध्ययन-अध्यापन प्रक्रिया ही काही वर्षापूर्वी पारंपारिक पध्दतीने होत होती. पण त्यात सुध्दा विज्ञान तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येत आहे. भारताचे पहिले राष्ट्रपती मा.डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णनच्या मते ग्रंथपाल हा शिक्षकाचा शिक्षक आहे. म्हणून कोणतेही महाविद्यालय किंवा विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता ठरवित असताना प्रामुख्याने ग्रंथालयाचा विचार केला जातो. नॅकचे मुल्यांकन होत असताना सुध्दा महाविद्यालयीन ग्रंथालय पूरवित असलेल्या सेवा सुविधा वर भर देण्यात येत असतो.

शैक्षणिक गुणवत्तेचा महाविद्यालयाबाबत विचार करत असताना परिस्थिती म्हणावी तसी चांगली आहे असे म्हणता येत नाही. दि. ०६ फेब्रुवारी २०१३ च्या Times of India या वर्तमानपत्रात माजी पंतप्रधान मा.मनमोहन सिंग यांनी असे मत व्यक्त केले की जगभरातील अव्वल २०० विद्यापीठामध्ये भारतातील एकही विद्यापीठ नाही. या क्रमवारीत येण्यासाठी आपण चांगले प्रयत्न करायला पाहीजेत.१ यावरुन आपणास असे म्हणता येईल की आपण शैक्षणिक

ISBN 978-93-5240-103-1
गुणवत्तेचा विचार करत असताना आपल्याला खूप प्रयत्न करावे लागणार आहेत.

महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता ही प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या संशोधनावर अवलंबून असते. महाविद्यालयीन ग्रंथपालाने प्राध्यापक/विद्यार्थी हे जास्तीत जास्त ग्रंथालयाचा कसा वापर करतात यावरुन शैक्षणिक गुणवत्ता कशी वाढवायची यासाठी काय करता येईल यावर उपाय योजना करणे आवश्यक आहे. ग्रंथपालाने पूढाकार घेऊन ग्रंथालय कसे उपयोगी आहे हे पटवून दिले पाहीजे.

महाविद्यालय :-

याचा अर्थ विद्यापीठ क्षेत्रात किंवा त्याच्या अधिकार क्षेत्रात असलेले विद्यापीठाला संलग्न असलेले महाविद्यालय असा होतो. महाविद्यालयामध्ये वैद्यकिय, औषधनिर्माण शास्त्र, अभीयांत्रीकी, कला, वाणीज्य, विज्ञान महाविद्यालय इ.प्रकार येतात. सध्या महाविद्यालयाची संख्या वाढतच आहे. महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता वाढती राहण्यासाठी ग्रंथालये महत्वाची भूमिका बजावू शकतात.

**ग्रंथालय :-**

ग्रंथालय म्हणजे ग्रंथसंग्रहाचे स्थान. ग्रंथालयामध्ये शालेय, महाविद्यालयीन, विद्यापीठीय, विशेष व सार्वजनिक ग्रंथालयाचा समावेश होतो. डॉ. राधाकृष्णन यांच्या मते ग्रंथालये ही विद्यापीठ महाविद्यालया अशा संस्थेचे ह्रदय असते. यावरुन ग्रंथालयाचे महत्व समजून येईल.

**शैक्षणिक गुणवत्ता :-**

शैक्षणिक गुणवत्ता म्हणजेच शि चांगल्या दर्जाचे शिक्षणामध्ये सातत्य राखणे. महाविद्यालयीन शैक्षणिक गुणवत्ता वाढावी म्हणून वेगवेगळे प्रयत्न करणे होय. शिक्षण म्हणजे सर्वांगिन विकास. मानवाची आत्तापर्यंत जी प्रगती झाली आहे ती शिक्षणामुळेच झाली आहे. शैक्षणिक गुणवत्ता म्हणजेच महाविद्यालयातील सर्व घटकांचा दर्जा चांगल्या पध्दतीने विकसीत होणे होय. यामध्ये प्रामुख्याने संशोधन अध्ययन अध्यापन यात सुधारणा होणे अपेक्षीत आहे.

महाविद्यालयीन ग्रंथालयामूळे शैक्षणिक गूणवत्ता वाढावी यासाठी पूढीलप्रमाणे प्रयत्न करता येतील. सदर गुणवत्ता वाढीसाठी ग्रंथालयातील कर्मचारी खूप मदत करु शकतात.

१) ग्रंथालय परीचय - प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्राध्यापक व विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय परीचय शिबीर घ्यावे जेणेकरुन वरील वाचकाना ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथसंग्रह, मासीके, दैनंदिन वर्तमानपत्रे यांची माहिती मिळेल. ग्रंथालयात उपलब्ध असलेले डेटाबेसेस, सिडी, मायक्रोफिल्म यांची माहिती मिळेल. म्हणजेच शैक्षणिक वर्षात जर काही नविन माहिती लागणार असेल तर ती कशी मिळवायची याचे ज्ञान होईल. तसेच यामूळे ग्रंथालय वापराचे ज्ञान पण समजण्यास मदत होईल.

ISBN 978-93-5240-103-1

२) Ask a Librarian - आठवडयातील एखादा दिवस किंवा महिन्यातील एखादा दिवस खास वाचकाच्या समस्या निराकरणासाठी ठेवता येईल. एखादी माहिती किंवा पुस्तक शोध निबंध आपल्याकडे नसेल तर तो कोठून मिळवायचा याचे मार्गदर्शन करणे रिसर्च संबंधी माहिती कशी उपलब्ध करुन देता येईल यासंबंधी विचार विमर्श करणे जेणेकरुन प्राध्यापक विद्यार्थी यांच्या समस्या सोडवून शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यात ग्रंथालयाची महत्वाची भूमीका ग्रंथपाल पार पाडू शकतो.

३) ग्रंथप्रदर्शन आयोजीत करणे - महाविद्यालयात विविध सांस्कृतीक कार्यक्रम तसेच थोर महापुरुषांचे जयंती साजरे करण्यात येत असतात. अशा प्रसंगी जर ग्रंथप्रदर्शन आयोजीत केली तर त्यास नक्कीच चांगला प्रतिसाद मिळेल. म.गांधी, म.फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंतीदिनी त्यांच्यावर लिखीत पुस्तकाचे प्रदर्शन जर आयोजीत केले तर नक्कीच ग्रंथालयाकडे वाचक येण्याचे प्रमाण वाढेल. उत्सुकतेमूळे विद्यार्थी या थोर महापुरुषांचे पुस्तके वाचण्यावर भर देतील. डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळाला पाहीजे. या सिध्दांताची पुर्तता होईल. शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास अशा कार्यक्रमाची मदतच होईल.

४) व्याख्याने, चर्चासत्रे व परिसंवाद- महत्वाच्या प्रसंगी ग्रंथालयाची उपयूक्ता. ग्रंथालयातील डेटाबेसेस वापरण्याचे फायदे अशा विषयावर व्याख्याने आयोजीत करता येतील. ग्रंथालयामार्फत विद्यार्थ्यांना काय काय सेवा सुविधा पुरवण्यात याबद्दल चर्चासत्रे व परिसंवादाचे आयोजन करावे. जेणेकरुन शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी अशा कार्यक्रमाची मदतच होईल.

५) दृक- श्राव्य माध्यमांचा वापर - सांस्कृतीक कार्यक्रम महाविद्यालयात साजरे होत असताना तसेच महापुरुषाच्या जयंती, पुण्यतिथीस लघूपट दाखवावेत. जेणेकरुन विद्यार्थ्यांत दृक-श्राव्य माध्यमांचा प्रभावी वापर होईल. अवकाश उडडाणाचे लघूपट जर दाखवले तर ते समजण्यास सोपे होईल. तसेच विद्यार्थी किंवा प्राध्यापकाच्या मागणीनूसार व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे एखाद्या व्याख्यानाचे आयोजन करुन शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्या दिशेने पूढे जाता येईल.

६) नविन पुस्तकाची प्रसिध्दी - नविन आलेल्या पुस्तकाची मुखपृष्ठे नोटीस बोर्डवर लावावीत तसेच ती पुस्तके कोणत्या विषयाशी संबंधीत आहे. याचे दहा ते बारा ओळीत विवेचन करावे. जेणेकरुन वाचक आकर्षीत होईल.

७) ग्रंथ संग्रह - महाविद्यालयीन ग्रंथालयात ग्रंथ संग्रह पूरेशा असावा. सर्व विषयांना सारखे महत्व दयावे. युजीसीने नेमलेल्या डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय सल्लागार समीतीने प्रत्येकी १००० विद्यार्थ्यांमागे ५०००० ग्रंथ संग्रह असावा असे प्रमाण दिले

आहे. २ पूर्वी ग्रंथसंग्रह म्हणजे फक्त पुस्तके असत पण सध्या ग्रंथ संग्रह म्हणजे परीषद अहवाल, वार्षीके, नकाशे, प्रतीकृती, प्रोजेक्टचे प्रबंध असे सर्व साहित्य असावे. जेंणेकरुन विदयार्थी व प्राध्यापकाना सहज साहित्य उपलब्ध होईल.

८) संदर्भ साधनाची उपलब्धता - महाविद्यायात संदर्भ साधने उपलब्ध असावीत मराठी विश्वकोष, एनसायक्लोपेडीया ऑफ ब्रिटानीका, प्रत्येक विषयाचे संज्ञाकोष उपलब्ध होईल. म्हणूनच शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी महाविद्यालयीन ग्रंथालयात चांगली संदर्भ साधने असावीत.

९) ग्रंथालयाची वेबसाइट - ग्रंथालयाच्या प्रभावी वापरासाठी वेबसाइट बनविणे खुप आवश्यक आहे. त्यात आवश्यक ती माहिती टाकावी. ग्रंथालयाची स्थापना, ग्रंथसंग्रह, वर्तमानकालीन योजना या सर्व बाबी व्यवस्थित असाव्यात ग्रंथालयाची नियमावली, सल्लागार समीती या पण असाव्यात ग्रंथालयात उपलब्ध सेवा सुविधाचा उल्लेख असावा.

१०) सोशल मिडीयाचा प्रभावी वापर - ग्रंथालयाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी व्हॉट्सॲप, फेसबूक, ब्लॉग, इन्टाग्राम यासारख्या सोशल मिडीयाच्या साधनाचा वापर ककरुन वाचकाना वाचना विषयी आवड निर्माण करावी.

११) ग्रंथालय संगणकीकरण - महाविद्यालयीन ग्रंथालयात येणारा वाचक वर्ग हा विदयार्थी असतो. ग्रंथालयातील उपलब्ध संख्या हाताळणे खूपच कठीण काम असते. ग्रंथालय संगणकीकरण जर केले तर ग्रंथालयीन कर्मचारी व वाचकाचा वेळ वाचतो. ग्रंथालय संगणकीकरणामुळे ग्रंथालयीन सेवा प्रभावीपणे व कमी वेळेत देता येतात. ग्रंथालय संगणकीकरणासाठी Inflibnet ने तयार केलेले soul software हे उपयुक्त आहे. डेटा एंट्री, तालीकीकरण, वर्गीकरण, देवघेव व पूस्तक खरेदी या प्रक्रिया खूपच लवकर होतात. म्हणून महाविद्यालयीन शैक्षणिक गुणवत्ता वाढीचा असणे खूपच आवश्यक आहे. ग्रंथालय संगणकीकरणामूळे अपूरे मनूष्यबळ असले तरी पण फारसा फरक पडत नाही. पध्दतशिरपणे कामकाज व्यवस्थित चालू राहते.

१२) ग्रंथालयय सुरक्षितता - ग्रंथालयात सी.सी.टी.व्हि बसविलेले आहेत काय ग्रंथालयातून पुस्तके चोरीला जाऊ नयेत म्हणून RFID (Radio Frequency Identification ) चा वापर चालू केला आहे काय एकंदरीत ग्रंथालय सुरक्षितता खुप महत्वाची आहे.

१३) पुस्तक परीक्षण स्पर्धा आयोजीत करणे - विशेष प्रसंगी वाचकांना लायब्ररीत आकर्षीत करण्यासाठी पुरतक परीक्षण स्पर्धा आयोजीत केल्या जाव्यात जेणेकरुन वाचकामार्फत वेगवेगळया विषयावरची पुस्तके वाचली जातील.

१४) डेटाबेसचा वापर - शैक्षणिक संशोधनात उपयूक्त असणारे डेटाबेस ग्रंथालयाने घेवून त्याचा व्यवस्थीत वापर करायला सुरुवात केली पाहिजे. Inflibnet चा N List हा डेटाबेस खास महाविद्यालयीन ग्रंथालये नजरे समोर ठेवून बनविला गेला आहे. या डेटाबेसमध्ये

ISBN 978-93-5240-103-1

एक लाख तीस हजार पुस्तके व सोळा हजार मासीके उपलब्ध आहेत. तसेच गुगल स्कॉलर, DOAB, DOAJ, JStore, Gutenburg Project असे मोफत डेटाबेस आहेत. त्यांचा पण वापर करण्यावर भर दिला पाहिजे.

१५) आंतर ग्रंथालयीन देवघेव - सध्याच्या स्थितीत पुस्तकांची संख्या खूपच प्रचंड वाढत चालली आहे. आज कोणत्याही ग्रंथालयाला सर्व पुस्तके संग्रही ठेवणे शक्य नाही. त्यावर चांगला उपाय म्हणजे आपल्या शहरातील आपल्या जिल्ह्यातील ग्रंथालयाशी आंतर ग्रंथालयीन देवघेव करणे. जेणेकरुन वाचकांच्या गरजा भागविल्या जातील.

१६) ग्रंथालयीन सेवा व सुविधा - शैक्षणिक गुणवत्तेचा विचार करत असताना ग्रंथालय सेवा व सुविधा कशा देते याचा विचार केला जातो. Open Access आहे का? Reading Room UGC ने ठरविलेल्या नियमा प्रमाणे उपलब्ध आहे का? या सर्व सेवा व सुविधा पुरवाव्या लागतात. जेणेकरुन शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यास मदत होते. ग्रंथालयातील सेवा व सुविधा या बाबी खुपच महत्वपूर्ण आहेत.

१७) E content किंवा E-Portal - याचा वापर पाठयक्रमातील एखादा किचकट भाग विद्यार्थ्यांना समजत नसेल तर E-content वरुन त्यांना नोटस काढून दयाव्े किंवा ग्रंथालयात E-portal वरील व्हिडीओ स्वरुपातील लेक्चर शोधण्यास मदत करावी अन्यथा ते कसे शोधावे किंक वर्ड कसे टाकावेत याची माहिती करुन द्यावी. E-content किंवा E-portal हे inflibnet च्या Website वर उपलब्ध आहेत. तसेच NPTEL मार्फत पण उपलब्ध करण्यायत आलेले आहेत. यु-ट्यूब वरील शैक्षणीक चॅनल सबस्क्राईब करुन पण आपणास नविन माहिती मिळविणे सोपे जाते.

**समारोप** - एकंदरीत वरील उपाय योजना अवलंबून शेक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी ग्रंथालय मदतीशर ठरु शकते. तसेच वाचकाचे पण व्यवस्थितरीत्या समाधान कारक रीत्या त्यांचे प्रश्न सोडवून त्यांना मदत करुन ग्रंथालयाचा परीपूर्ण वापर होतो.

**संदर्भ सुची -**

१) Times of India Page १

२) वीर.डी. ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे अधिष्ठान, एज्युकेशनल पब्लीशर्स, २०१०, औरंगाबाद.

३) वीर.डी. ग्रंथालय आणि माहिती शास्त्राचे अधिष्ठान, एज्युकेशनल पब्लीशर्स, २०१०, औरंगाबाद.

४) फडके.द.ना. ग्रंथालय संगणकीकरण - युनिवर्सल प्रकाशन २०१०, पाचवी आवृत्ती पुणे.

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

Vol. (I)

12 January 201. Special Issue – 92

# Recent Trends In Public Adminstration : Theories, Practice & Future

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Bidwe T.S.
Assit. Prof. Head of Dept.
*Public Administraion*
*Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed*

SWATIDHAN PUBLICATION

Visit to - www.researchjourney.net

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Good Governance and Indian Democracy | Vijay Maroti Magare | 7 |
| 2. | Good Governance at a Glance | Dr. Santram Prabhakar Mundhe | 9 |
| 3. | सुशासन | प्रा.दीक्षित एस.डी. , प्राचार्य डॉ.पिंपळे बी.एस | 11 |
| 4. | नवलोकप्रशासन व व्यवस्थापन | प्रा. कल्याण ज्ञानोबा वडमारे | 13 |
| 5. | लोक प्रशासन काल, आज आणि उद्या | प्रा. प्रविण पांडुरंगराव लोणारकर | 15 |
| 6. | लोकनिवड दृष्टिकोन | डॉ.मंचक मोर, डॉ.जे.बी. कांगणे | 17 |
| 7. | सुशासन संकल्पना | डॉ.एस.एन.आकुलवार | 19 |
| 8. | लोकनिवड दृष्टीकोन | डॉ. स्मिता काशिनाथराव मरवाळीकर | 21 |
| 9. | सार्वजनिक धोरणाची प्रक्रिया | प्रा. बाबुराव भिमराव जाधव | 23 |
| 10. | लोक निवड द्रष्टिकोन - लोक प्रशासन | प्रा. डॉ.भोयटे अमित जनार्धन | 25 |
| 11. | व्यवस्थापन आणी प्रेरणा : खेळडूचे मनोबल वाढवणारे घटक | डॉ. डोंगरे माधव रा. | 27 |
| 12. | नवलोक व्यवस्थापन | हेळंवे हनमंत बालाजी | 29 |
| 13. | सुशासन तथा ई-प्रशासन | डॉ.भालेराव सुधाकर नारायण | 31 |
| 14. | नवलोक व्यवस्थापण संकल्पना आणि नवलोक व्यवस्थापनाचे पारिणाम | डॉ.प्रा.शिंदे डि.एस. | ३४ |
| 15. | सुशासन - विकासाची अनिवार्य अट | प्रा. प्रविण पांडुरंगराव लोणारकर | 37 |
| 16. | सार्वजनिक क्षेत्रात खाजगी भागीदारी | डॉ.शिंदे सुरेखा सदाशिवराव | 39 |
| 17. | लोकप्रशासनातील एक नवप्रवाह - नवलोक व्यवस्थापन | प्रा.शेख मोहंमद हनिफ इस्माईलसाब | 41 |
| 18. | लोक प्रशासन आणि सुशासन | डॉ. आरडले एस.डी | 43 |
| 19. | आजच्या युगातील सु-शासन आणि स्मार्ट प्रशासन | प्रा. डॉ.जे.के. भालेराव | 45 |
| 20. | नवलोकप्रशासन- लोकप्रशासनाचे नवे क्षितिज | प्रा. गिता गिरवलकर | 47 |
| 21. | छत्रपती शिवाजी महाराजांचे सुशासन (सुराज्य) | प्रा.डॉ. पांडुरंग पंढरीनाथ मुंढे | 52 |
| 22. | सार्वजनिक क्षेत्रात खाजगी भागीदारी लाभ, अडचणी व भवितव्य | डॉ. चंद्रशेखर गित्ते | ५५ |
| 23. | नागरिकांची सनद | डॉ.दिपक एस वाघमारे | 60 |
| 24. | Cyber Crimes Affecting Business Administration | Dr. M.S. Bisen | 63 |
| 25. | E- Governance and E-Health in India: A Review | Ms.Seema Nikalje | 66 |
| 26. | It Act For Good Governance | Dr. Khakare Vikas | 69 |
| 27. | माहिती तंत्रज्ञानाचा लोकप्रशासनावरील प्रभाव | डॉ.शिवाजी लच्छिराम राठोड | 72 |
| 28. | भारतातील ई-प्रशासन वाटचाल व सद्यस्थिती | डॉ. गोविंद येडले | 74 |
| 29. | लोकप्रशासनात ई-प्रशासनाची उपयोगिता : | डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव | 76 |
| 30. | भारतीय प्रशासकीय बदलात माहिती तंत्रज्ञानाची भूमिका | डॉ. प्रमोद मा. आचेगावे | 78 |
| 31. | ई -शासन | प्रा. डॉ. दिंडे सुधिर प्रकाशराव, श्री. चव्हाण पंडित विठ्ठल | 80 |


Principal
Late.Sow.Sheshabai Sitaram Mundhe College
Gangakhed

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue 92 , Recent Trends in Public Adinistration : Theories, Practice & Future | January 2019 | UGC Approved No. 40705

# लोकप्रशासनात ई-प्रशासनाची उपयोगिता :

डॉ.पिनाटे किरण प्रल्हादराव
लोकप्रशासन विभाग, कै.सौ.शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय,गंगाखेड

---

**प्रस्तावना :**

आधुनिक काळ हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा काळ म्हणून ओळखला जातो. 21 वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक मानले जाते. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रसार व प्रशारामुळे जगात अनेक क्षेत्रात क्रांतीकारक बदल झाले आहेत.प्रत्येक राष्ट्र सर्वांगीण विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रावर परिणाम झाला. आज जगातील सर्वच देशातील शासन यंत्रणा व प्रशासकीय व्यवस्थेवर तंत्रज्ञानाचा परिणाम होऊन शासन व प्रशासन यंत्रणेत मूलभूत बदल झालेले दिसतात.

आधुनिक समाजाच्या आवश्यकता व अपेक्षा पूर्ण करण्यात पारंपारिक प्रशासकीय व्यवस्था म्हणावी तेवढी यशस्वी झाली नाही.प्रशासकीय कार्यातील वाढ,कार्याचे गुंतागुंतीचे स्वरूप,नोकरशाही प्रवृत्ती,जनतेप्रती असलेली उदासीन भूमिका,अकार्यक्षमता, अपारदर्शकता, लालफितशाही,भ्रष्टाचार इ.मुळे प्रशासकीय व्यवस्था बेजबाबदार व अकार्यक्षम बनली.दोष दूर करून प्रशासनाला अधिक जनताभिमुख व उद्दिष्टाभिमुख बनविण्याच्या दृष्टीने प्रशासनात आधुनिक इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. त्यालाच ई-प्रशासन असे म्हणतात. आधुनिक काळात ग्रामपंचायत कार्यालयापासून ते पंतप्रधान कार्यालय युनोच्या सचिवालयापर्यंत संगणक व माहिती तंत्रज्ञानाचा अवलंब केला जात आहे. शाळा,महाविद्यालये,बँका,वित्तीय संस्था,विद्युत कार्यालये,रेल्वे,परिवहन व्यवस्था,महसूल इ.सर्वच क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानामुळे प्रशासनाला नवीन स्वरूप प्राप्त झाले आहे.

**ई-प्रशासनाची पार्श्वभूमी :-**

ई-प्रशासनाच्या विचाराची मुळे अमेरिकेतीला गोर कार्यक्रमातील शासनासाठी जे चांगले काम करते आणि कमी किंमत आकारते अशा घोषणेत आढळतात. 1995 मध्ये G-7 राष्ट्रांनी ऑनलाईन शासन आणि इ.स.2000 मध्ये मांडलेल्या ई-युरोम या विचारांचेच व्यापक व नियोजित स्वरूप म्हणजे ई-प्रशासन होय.इ.स.2003 मध्ये सिंगापूरमध्ये भरलेल्या कोमोमंत्री परिषदेत असा निष्कर्ष काढण्यात आला की,नागरिकांना आणि संघटनेला पुरविल्या जाणाऱ्या सेवामध्ये सन्मुखता असावी आणि त्यासाठी पर्यायी उत्तर याच परिषदेत सापडले ते म्हणजे ई-प्रशासन आणि तेव्हा पासुन ई-शासन,ई-प्रशासन चर्चेत आहे. शासनाची कार्य प्रक्रिया बदलण्याचे साधन या स्वरूपात ई-प्रशासनाला मान्यता मिळाली.शासनाकडून जनतेला लागणाऱ्या सेवा आणि माहितीचे तत्पर प्रदानिकरण ई-प्रशासनामुळे सहज सुलभ होऊ शकते. हे स्पष्ट झाल्यानंतर झपाट्याने सर्वच विकसित व विकसनशील राष्ट्रांनी प्रशासनात ई.पध्दतीचा स्वीकार केला. वेगवेगळया राष्ट्रांनी तो वेगवेगळया पातळयावर वेगवेगळया कारणांसाठी केलेला असला तरी शासन व प्रशासन प्रक्रियेत सर्वत्र ई.माध्यमांचा वापर करण्यास सुरूवात झालेली आहे.

**भारतातील राष्ट्रीय ई-प्रशासन योजना :-**

भारतीय प्रशसनातील दप्तरदिरंगाई,लालफितशाही,कार्याचा विलंब हे दोष टाळण्यासाठी व सुधारणा करण्यासाठी दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगातील 11 व्या अहवालात विरप्पा मोईलीने नमूद केल्याप्रमाणे नागरीकांना वेळ बाचावा व त्यांना त्वरीत सेवा मिळावी या करीता नागरिकांच्या सेवांना अग्रक्रम दिला जावा यादृष्टीने-18 मे 2006 रोजी राष्ट्रीय-ई-प्रशासन योजना घोषीत करण्यात आली. ही योजना देशातील ई-प्रशानाच्या पायाभरणीसाठी व त्यांच्या दीर्घकालीन विकासासाठी प्रोत्साहन देण्याकरीता आखण्यात आली. या योजनेत सामन्य माणसाला त्याच्या राहत्या ठिकाणीच सर्व शासकीय योजनांची माहिती ई-प्रशासनाच्या माध्यमातून उपलब्ध करून देणे हे महत्वाचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

भारतात माहिती तंत्रज्ञान विभागाने परंपरागत शासकीय कामकाजाचे ई-प्रशासनामध्ये रूपांतर करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. सध्या भारतीय प्रशासनात अधिकार अभिलेख, भू-अभिलेख,मालमत्ता नोंदणी,वाहन नोंदणी,वाहन परवाना, वाणिज्यविषयक सेवा,बाजारभाव,दुरस्थ शिक्षण यांच्याशी संबंधीत सेवा इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे दिल्या जातात. तसेच शिक्षण, शिष्यवृत्या,प्रवेश निकाल,सेवानिवृत्ती वेतन,शिधापत्रिका,लोकतक्रार निवारण,पोलिस सेवा,माहितीचा अधिकार याही उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

भारतात गेल्या काही वर्षात ई-प्रशासन राबवताना विलक्षण आणि अत्यंत प्रगत अशा माध्यमाद्वारे विकासाचे जे अनेक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. त्याच्याशी चकिमान शासन, कमाल प्रशासनछ या संकल्पनेचा निकटचा संबंध आहे. माहिती आणि तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे अनेक सर्वाजनिक सेवा ऑनलाईन पध्दतीने पुरवणे शक्य झाले आहे. केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभागाच्या राष्ट्रीय ई-प्रशासन विभागाच्या अंदाजानुसार विविध केंद्रीय मंत्रालये आणि राज्य सरकाराने सुमारे 3500 हून अधिक ई-सेवा देऊ करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय माहिती केंद्राच्या अंदाजानुसार विविध मंत्रालये आणि राज्य सरकारांची सुमारे 8000 हून अधिक पोर्टल आणि संकेत स्थळे केंद्रामार्फत चालवली जातात.

**उमंग :-**

ई-प्रशासनात मोबाईल फोनचे महत्व वाढत असल्याने सरकारने नुकतेच च युनिफाईड मोबाईल ॲप्लकेशन फॉर न्यूएज गव्हर्नन्साछ याचीच इंग्रजी आद्याक्षरे घेऊन उमंग हे अप्लीकेशन सुरू केले.नव्या काळातील प्रशासनासाठी उपयोगी ठरेल असे हे मोबाईलवर वापरता येईल असे ॲप्लीकेशन आहे.इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि राष्ट्रीय ई-प्रशासन विभाग यांनी उमंग हे ॲप विकसित केले

आहे. देशभरातील सर्व भारतीय नागरिकांना उमंग एक समान व्यासपीठ पुरवते. यामध्ये केंद्र सरकारपासून ते स्थानिक सरकारी संस्था आणि इतर नागरिक केंद्रित सेवा, ई-सरकारी सेवा माध्यमातून लोकांना उपलब्ध होतात.केंद्र आणि राज्य सरकारांचे विविध विभाग, स्थानिक संस्था आणि खाजगी संस्थाकडून घेण्यात येणाऱ्या इतर उपयुक्त सेवा छमंगड या ॲपद्वारे पुरवल्या जातात. यामध्ये एकसंध पध्दत वापरण्यात आली असून नागरिकांना एकच ॲप्लीकेशन वापरून बहुविध सरकारी सेवांचा लाभ घेता येतो. स्मार्टफोन,टॅब्लेट आणि डेस्कटॉप या सर्व माध्यमांद्वारे हे ॲप्लीकेशन वापरण्याची संधी उपलब्ध करून देण्यत आली आहे.

**माय जीओव्ही (My Gov.) एक सरकारी उपक्रम :-**

माय जीओव्ही डॉट इन (My Gov.in) हा एक अनन्यसाधारण आणि महत्वाचा असा सरकारी उपक्रम आहे. पंतप्रधानांनी 2014 मध्ये हा उपक्रम सुरू केला. सामान्य नागरिकांचा मोठया प्रमाणावर सहभाग. हे याचे महत्वाचे वैशिष्टये ठरले आहे. माहितीचा प्रसार करणे आणि जनमत अजमावणे हा या व्यासपीठाचा एक अविभाज्य घटक बनला आहे. देशातील प्रशासन प्रक्रियेमध्ये नागरिकांना आवाज देण्याचे त्यांचे मत नोंदवण्याचा अधिकार देण्याचे काम या संकेतस्थळाने केले आहे.

सध्याच्या काळात मोबाईल फोन,स्मार्टफोन आणि व्हॅट्सॲप सारख्या ॲप्लीकेशनचा देशाच्या अगदी दुर्गम भागातही मोठया प्रमाणावर होत असलेला स्वीकार आणि वापर बघता येत्या काही वर्षातच जिथे मानवी हस्तक्षेप करावा लागतो अशी क्वचितच एखादी सेवा राहील तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे हे भविष्यातील चित्र नक्कीच लाभदायक आहे.

ई-प्रशासनाचा वापर भारतात अनेक राज्यात मोठया प्रमाणाता केला जात असून अनेक राज्याला या प्रकल्पाअंतर्गत यशही मिळाले आहे. यात हैद्राबाद मधील ई-सेवा,अंधप्रदेशातील ई-पंचायत,उत्तरप्रदेशातील लोकवाणी कार्यक्रम,मध्यप्रदेशातील ई-चौपाल,महाराष्ट्रातील सेतु सुविधा केंद्र,केरळमधील फ्रेन्ड,कर्नाटकामधील भूमी इतरही अनेक प्रकल्प ज्याला नागरिकांचाही मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. यावरून लक्षात येते की भारताचे 2020 चे स्वप्न साकार होण्यासाठी ई-प्रशासन नक्कीच मदतशील व महत्वाचे ठरत आहे.

**संदर्भ सूची :-**

1. लोकप्रशासनाची मुलतत्वे : प्रा.खुमसे व प्रा.रेड्डी.
2. लोकप्रशासन परिचय व मुलत्त्वे : डॉ.पी.व्ही.भुताळे व डॉ.बी.सी.वडवळे, क्रिएटिव्ह पब्लिकेशन्स,नांदेड,2014.
3. योजना : फेब्रुवारी 2018 विकास समर्पित मासिक.
4. लोकप्रशासनातील नवप्रवाह - डॉ.प्रिती पोहेकर, अरूणा प्रकाशन - 2010.